विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ

नोंदणी क्रमांक - ५२८/८३ एफ - ४१३०

# सुधाकरपर्व

२०२४ - २०२५




NLC
राष्ट्रीय विधायक सम्मेलन भारत
CAPACITY ENHANCEMENT PROGRAM
for STATE LEGISLATORS of BHARAT 2025
Mahatma Gandhi (1869-1948)
An eye for an eye only ends up making the
Mahatma Gandhi
Father of the Nation

## मार्गदर्शक



# श्री. व्ही. यू. डायगव्हाणे

माजी विधान परिषद सदस्य (१९९२ ते २०१०)

सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ, मुंबई

माजी सरकार्यवाह, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ

# सुधाकरपर्व

२०२४ - २०२५

**संकल्पना / संपादन**

**हितेश गोहोकार**

**सहाय्य**

**प्रभाकर पारखी**

**डॉ. विजय हेलवटे**

**मुद्रितशोधक**

**प्रा. प्रमोद उरकुडे**

**प्रकाशक**

**संपर्क कार्यालय, चंद्रपूर**


**-: संपर्क कार्यालय :-**

* **चंद्रपूर** : श्रीकृपा कॉलनी, जगन्नाथ बाबा नगर, दाताळा रोड, चंद्रपूर

* **नागपूर** : लक्ष्मी विहार कॉम्प्लेक्स, मेट्रो पिल्लर नं. ५४ जवळ, सोमलवाडा, नागपूर





२०२३ - २०२४


Sudhakar Adbale   92847 23492




@Design by HP Digital, Chandrapur

# शुभेच्छा संदेश

सन १९४६ मध्ये विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाची स्थापना झाली. ७९ वर्षांपूर्वी स्थापन झालेली ही महाराष्ट्रातील सर्वात मोठी शिक्षक संघटना म्हणून आजही गौरवाने कार्यरत आहे. आजवर संघटनेने अनेक आमदार दिलेत. २ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा. सुधाकर अडबाले यांची पहिल्या पसंतीच्या मताधिक्याने नागपूर विभाग शिक्षक मतदार संघातून निवड झाली. विधान परिषद सदस्य व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह म्हणून संघटना पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने विद्यार्थी व शिक्षण क्षेत्रातील सर्व घटक व समाज घटकांसाठी त्यांनी केलेले उल्लेखनीय कार्य अभिनंदनास पात्र आहे.

अवघ्या अडीच वर्षात शिक्षणाधिकारी ते मंत्री यांच्यासोबत घेतलेल्या बैठका व विधान परिषद सभागृहात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सुचना, नियम ९३च्या सुचना व औचित्याचे मुद्दे इ. आयुधाद्वारे अनेक मागण्या / समस्या निकाली काढण्यात यश मिळाले. यामुळे शासन व्यवस्थेवर आपला व संघटनेचा दबदबा निर्माण झाला.

नविन निवृत्ती वेतन योजनेत झालेली सुधारणा, १५ मार्च २०२४ च्या कर्मचारी निर्धारण शासन निर्णय, मुख्याध्यापक पदास मिळालेले संरक्षण, शाळा / तुकड्यांना पावसाळी अधिवेशनात मंजुर झालेले टप्पा अनुदान इ. मागण्या मंजूर करण्यास आपले मिळालेले सहकार्य उल्लेखनीय आहे. उर्वरित मागण्या मंजूर करणे व गुणवत्तापूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे, यासाठी आपली कटीबध्दता असावी. अस्तित्वात नसलेल्या शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या बोगस शालार्थ आयडी घोटाळ्याची विशेष चौकशी पथकामार्फत (एस.आय.टी.) करावयाच्या चौकशीचा निर्णय यात आपला पुढाकार लक्षणीय आहे.

आपल्या व संघटनेच्या प्रशंसनीय कार्याचे प्रसारण करणारा 'सुधाकरपर्व' या विशेषांकाचे प्रकाशन होत आहे. आपल्या या नव्या उपक्रमासाठी व वाढदिवसानिमित्य भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!



**- व्ही. यू. डायगव्हाणे,** माजी शिक्षक आमदार

सरचिटणीस, म.रा. माध्यमिक शिक्षक महामंडळ

# अनुक्रमणिका

"सुधाकरपर्व" ६
शिक्षक आमदाराचा संघर्षमय प्रवास ७
विधिमंडळातील कामकाज १२
विधिमंडळात मांडलेले ठळक व महत्त्वाचे मुद्दे १४
विधिमंडळातील मागील एका वर्षातील पाठपुराव्याला आलेले यश १८
जुन्या पेंशन योजनेसाठी आग्रही भूमिका २६
समस्या तुमच्या, पुढाकार आमचा (२०२३-२४) ३०
समस्या तुमच्या, पुढाकार आमचा (२०२४-२५) ३२
'ऑन द स्पॉट' मान्यता ३४
मंत्र्यांसह बैठक ३८
विमाशि संघाचे कार्यतत्पर सरकार्यवाह ४०
मृत कामगाराच्या कुटुंबियांना मिळवून दिले ७० लाख रुपये ४२
अपघातग्रस्तास मदत, विचारपूस ४३
सोशल मीडियावरील प्रतिक्रिया ४४
विकासकामे ४६
'रोजगार हमी योजना'सह तीन समित्यांवर नियुक्ती ४७

आमदार सुधाकर अडबाले यांना फॉलो करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

व्हाट्सॲपवर संपर्क साधण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा


उमेदवार


निवडणूक प्रचार



संपादकीय

# "सुधाकरपर्व"



"शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी हेच आपले कुटुंब मानणारे." शिक्षकांचे हित हाच ध्यास मनी बाळगणारे. दिवस असो वा रात्र शिक्षकांचा फोन आला आणि सरांनी उचलला नाही, असे कधीही झाले नाही. त्यामुळे विदर्भातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तोंडी एकच नाव दिसते आणि ते म्हणजे आमदार सुधाकर अडबाले यांचे. एका अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सुधाकर अडबाले सरांनी शिक्षक ते शिक्षक आमदार अशी किमया साधली आहे. सरांचा हा संघर्षमय प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे. १० ऑगस्ट रोजी सरांचा वाढदिवस. सरांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मागील एका वर्षातील कार्याचा आढावा घेणारा "सुधाकरपर्व" हा विशेषांक प्रकाशित होत आहे.

अडबाले सरांच्या घरची परिस्थिती जेमतेम होती. मात्र, आईवडिलांनी मुलांच्या शिक्षणात कुठेच कमी केले नाही. मोठे भाऊ - वहिनी यांच्या सानिध्यात अडबाले सरांनी शिक्षण पूर्ण करून शिक्षकी पेशा स्वीकारला. शिक्षणासोबतच, समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांनी अनेक सामाजिक संस्थांमध्ये काम केले आणि लोकांसाठी मदत करत राहिले. आपल्या प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रमांमुळे त्यांनी शिक्षकांची मने जिंकली आणि आमदार म्हणून निवडून आले. ते केवळ एक यशस्वी शिक्षक आणि आमदारच नाहीत तर ते एक आदर्श व्यक्ती आणि प्रेरणादायी नेते देखील आहेत. त्यांचे साधे जीवन, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम हे अनेकांसाठी प्रेरणादायी आहेत.

सरांच्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित होत असलेला "सुधाकरपर्व" हा विशेषांक त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा आहे. यात शैक्षणिक, सामाजिक व सर्वसामान्यांसाठी केलेल्या योगदानाचेही वर्णन आहे. आपल्या आयुष्यात अनेक अडचणींवर मात करत यशस्वी होण्याचा आदर्श दाखवून दिला आहे. त्यांचे विचार, कार्य व प्रेरणा पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरणार आहेत.

**- प्रभाकर पारखी**




# शिक्षक आमदाराचा संघर्षमय प्रवास

***गुरुवार, २ फेब्रुवारी २०२३ चा दिवस... नागपूर विभाग शिक्षक मतदार संघ निवडणूक... दुपारी १२ वाजता न्यूज चॅनेलवर बातमी झळकली.... सुधाकर अडबाले सर मतमोजणीच्या प्रत्येक फेरीत आघाडीवर... हीच वार्ता बाहेर येत होती... जसजशी मतमोजणी सुरू होती, तस - तसा विमाशि संघाच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह वाढत होता... मतमोजणी केंद्राबाहेर दुपारी २ वाजल्यापासून बँड वाजू लागला... फटाके फूटू लागलेत... कार्यकर्ते नाचू लागले... जणू विजय आपलाच... शेवटी तो क्षण आलाच... रात्री ८ वाजता सुधाकर गोविंदराव अडबाले यांना विजयी घोषित करण्यात आले... विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा गड बारा वर्षांनंतर अविरत संघर्ष करून परत आणला ते कणखर, अभ्यासू, संघर्षशील नेतृत्त्व सुधाकर अडबाले यांनी.... तिथून सुरवात झाली ती सुधाकरपर्वाची...***

सुधाकर अडबाले यांनी बालपणापासूनच संघर्ष पाहिला आहे. चंद्रपूरजवळ असलेल्या मोठा मारडा या गावी अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. साधारणतः शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या मुलांना जो संघर्ष सहन करावा लागतो, तो त्यांच्याही



वाट्याला आला. मात्र, शिक्षणाप्रती असलेल्या ओढीने त्यांची स्थिती बदलली. त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक आणि पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी वर्धा येथे मोठा भाऊ निळकंठराव अडबाले यांच्याकडे पूर्ण केले. ५ वी ते ७ वी लोक विद्यालय आणि ८ वी ते १० वीचे शिक्षण न्यू इंग्लिश हायस्कूल येथे झाले. ग्रामीण महाविद्यालयात १२ वी पूर्ण केली. जे. बी. विज्ञान महाविद्यालय वर्धा येथे विज्ञान विषयात पदवी संपादन केल्यानंतर चंद्रपूरच्या जनता महाविद्यालयातून बी.एड.ची पदवी प्राप्त केली. बी.एड. झाल्यानंतर ते लगेच २० जुलै १९८७ साली जनता विद्यालय, पिपरी येथे सहायक शिक्षक म्हणून रूजू झाले. त्यानंतर १९८८ मध्ये जनता विद्यालय, घुग्घुस येथे रूजू झाले. या विद्यालयात सुरू झालेला शिक्षकी पेशाचा प्रवास थेट ३१ ऑगस्ट २०१८ रोजी सेवानिवृत्तीपर्यंत सुरू राहिला.

शिक्षक म्हणून मुलांना घडविण्यासोबतच सामाजिक व सहकार क्षेत्रातही आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटविला. शिक्षण क्षेत्रातील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या सबळ राहून कोणत्याही गरजेच्यावेळी त्यांना कुणासमोर हात पसरण्याची गरज पडणार नाही, हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून 'नागपूर विभाग शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्थे'ची स्थापना केली. सुधाकर अडबाले यांनी ठरविलेले हे ध्येय होते आणि त्यांनी पहिले पाऊल टाकले होते. २००४ साली १३ शाळा, १३९ सभासद आणि ४२ हजार रुपये भागभांडवलावर ही पतसंस्था त्यांनी सुरू केली. सुधाकर अडबाले यांनी लावलेल्या या इवल्याशा रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र आज नागपूर विभागातील ६ महसुली जिल्ह्यांपर्यंत विस्तारले आहे. पूर्व विदर्भात या पतसंस्थेच्या १६ शाखा असून ७७११ सभासद झाले आहेत

आणि पतसंस्थेचा टर्न ओव्हर ७५० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. या पतसंस्थेचे आता अमरावती विभागात सुद्धा कार्यक्षेत्र सुरू झाले आहे व लवकरच अमरावती विभागात देखील शाखा सुरु होईल. अडचणीतील कर्मचाऱ्यांना आर्थिक मदत देणे, त्यांची गरज भागविण्याचे काम संस्थेने केले आहे. सभासदाचे कोणत्याही कारणाने निधन झाल्यास त्यांच्याकडे असलेले १०० टक्के कर्ज माफ करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव पतसंस्था आहे. कोरोनामध्ये निधन झालेल्या अनेक शिक्षक, शिक्षकेत्तर सभासदांचे १०० टक्के कर्ज संस्थेने माफ केले आहे. शिवाय राज्य शासनाला मदत म्हणून पतसंस्थेकडून १ लाख रुपयांचा मदत निधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देण्यात आला. या संस्थेचे कार्य एवढ्यापुरते मर्यादित नाही. संस्थेद्वारे विविध सामाजिक उपक्रमसुद्धा राबविले जातात. त्यामुळेच सर्व सभासदांना या संस्थेबद्दल आपलेपणाचा विश्वास निर्माण झाला आहे. हा विश्वास निर्माण करण्याचे श्रेय सुधाकर अडबाले यांच्या संकल्पना व व्यापक दृष्टीकोनाला जाते.

अडबाले यांचा वि.मा.शि संघटनेतील प्रवेशही त्यांच्या लढाऊ वृत्तीतूनच झाला. शिक्षकांसाठी अनेक आंदोलन करताना ते विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ या संघटनेशी जुळले. १९४६ पासून ही संघटना शिक्षकांसाठी काम करत आहे. १९८८ साली सुधाकर अडबाले संघटनेचे आजीवन सभासद झाले. १९९८ साली ते चंद्रपूर जिल्हा संघटक व २००२ मध्ये त्यांची जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. २५ ऑक्टोबर २०१५ मध्ये त्यांना प्रांतीय सरकार्यवाह या पदावर जबाबदारी देण्यात आली. या पदावर ते आजतागायत कार्यरत आहेत. २१ मार्च २०२१ रोजी संघटनेच्या ध्येयधोरणानुसार लोकशाही पद्धतीने नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाच्या २०२२-२३ च्या निवडणुकीसाठी अधिकृत उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. अडबाले परिवारात कुणी साधा ग्रामपंचायत सदस्यही झाला नसताना नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाची प्रतिष्ठेची ही निवडणूक त्यांनी पहिल्या फेरीतच विक्रमी मतांनी जिंकली. हे त्यांनी केलेल्या कार्याचे फलित होय. संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सुधाकर अडबाले यांचे प्रयत्न सातत्याने सुरूच आहे. १ नोव्हेंबर २००५ नंतर लागलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन



योजना लागू होईपर्यंत सभागृहात व सभागृहाबाहेरही त्यांचा लढा सुरूच राहील, असा त्यांचा निर्धार आहे. पूर्व विदर्भातील सहाही जिल्ह्यांमध्ये त्यांचा दांडगा शिक्षक संपर्क आहे आणि गेल्या ३७ वर्षांपासून संघटनेच्या कार्याचा अनुभव त्यांच्याकडे आहे. या अनुभवाला आमदारकीची जोड मिळाली आहे. ८ फेब्रुवारी २०२३ रोजी जुन्या पेंशनची टोपी आणि दुप्पटा घालून विधानपरिषद सदस्य पदाची शपथ घेतली. विधान परिषदेच्या निवडणुकीत पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेले शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांची विधान परिषदेच्या सभागृहातील पहिलीच एन्ट्री ही प्रभावी ठरली. सभागृहात पहिल्यांदाच गेलेले शिक्षक आमदार अडबाले यांनी शिक्षकांच्या समस्यांकडे सभागृहाचे लक्ष वेधले. प्रश्नांची केलेली मांडणी पाहून खुद्द सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांचे कौतुक केले. आमदार अडबाले हे शिक्षकांसह सर्वसामान्यांच्या प्रश्नांना घेऊन किती गंभीर आहे हे, त्यांच्या गेल्या आठ अधिवेशनात सभागृह व राज्याने बघितले आणि पुढेही बघत राहीलच, यात तीळमात्र शंका नाही.

आमदार सुधाकर अडबाले सर निवडणुकीपूर्वी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह म्हणून विदर्भातील अकरा जिल्ह्यात नेहमीच दौऱ्यावर असायचे. शिक्षकांच्या समस्यांना घेऊन आंदोलने, बैठका, मोर्चे हे सुरुच असायचे. आपण नेहमी बघतो की, आमदार झाल्यावर लोक थांबतात. पण हे पहिले आमदार असतील जे निवडून येण्याआधी जसे फिरत होते तसेच निवडून आल्यानंतरदेखील सतत फिरत आहेत. आज आमदार अडबाले यांना निवडून येऊन अडीच वर्षांचा कालावधी होतोय. एकही दिवस ते घरी नाहीत. सतत नागपूर, अमरावती विभागातील ११ ही जिल्ह्यांत न थकता, न थांबता शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी प्रयत्नरत आहेत.

एका अल्पभूधारक शेतकरी कुटूंबात जन्म ते शिक्षक आमदार हा त्यांचा ६५ वर्षांचा संघर्षमय प्रवास, आज अनेकांसाठी प्रेरणादायी असाच आहे. आज १० ऑगस्ट २०२५ रोजी त्यांचा वाढदिवस. त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने मागील एका वर्षातील कार्याचा आढावा घेणारा 'सुधाकरपर्व' हा विशेषांक.

आदरणीय आमदार श्री. सुधाकर अडबाले सर यांना वाढदिवसानिमित्त उदंड आयुष्याच्या अनंत कोटी शुभेच्छा!

**- हितेश गोहोकार,**
स्वीय सहायक









# सुधाकरपर्व

## विधिमंडळातील कामकाज

| | |
|---|---|
| एकूण अधिवेशन | 8 |
| एकूण अधिवेशनाचे दिवस | 96 |
| एकूण उपस्थिती | 96 |
| लक्षवेधी सूचना | 58 |
| सादर केलेले तारांकित प्रश्न | 206 |
| स्वीकृत झालेले तारांकित प्रश्न | 84 |
| सादर केलेले अशासकीय ठराव | 11 |
| सादर केलेले विशेष उल्लेख | 39 |
| सादर केलेले औचित्याचे मुद्दे | 16 |

सभागृहातील पहिल्या भाषणाचा व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा






शब्दांना सत्याची धार
**प्रहार**

## बोगस शिक्षक भरती घोटाळ्याची एसआयटी करणार चौकशी

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

राज्यात २ मे २०१२ पासून शिक्षक भरती बंदी असतानाही नागपूर आणि अनेक जिल्ह्यांतील शाळांमध्ये २०१९ ...

असे आश्वासन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली. विधान परिषदेत याबाबत सुधाकर अडबाले यांनी तीन समित्यांनी अहवाल दिल्यानंतर ...

**पुण्य नगरी**

## शालार्थ आयडी घोटाळ्याची राज्यस्तरीय एसआयटी करणार चौकशी

आ. अडबाले यांच्या प्रश्नावर शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांची माहिती

पुण्य नगरी / प्रतिनिधी



**पुढारी**

## राज्य सरकारकडे पैसे नसल्याने महाज्योतीचे १२६ कोटी थकले!

निधीसाठी पाठपुरावा सुरू; मंत्री संजय शिरसाट यांची विधान परिषदेत माहिती

सर्व संस्थांना समान पातळीवर आणणार : शिरसाट

**देशोन्नती**

आ. अडबाले यांच्या तारांकित प्रश्नावर शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचे उत्तर

## यवतमाळ शिक्षणाधिकारी (माध्य.) कार्यालयातील दोषींवर कारवाई करू

देशोन्नती वृत्तसंकलन

यवतमाळ : शिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. कार्यालयाची चौकशी झाली असता त्यात अनियमितता झाल्याचे चौकशीत ...

संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत २४ फेब्रुवारी रोजी नियोजित धरणे निदर्शन आंदोलन करण्यात आले. मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार सुधाकर अडबाले यांनी ...

**पुण्य नगरी**

## न. प. शाळांतील शिक्षक-कर्मचारी पेन्शन योजनेपासून वंचित

आमदार सुधाकर अडबाले यांनी वेधले सरकारचे लक्ष : एक ते दीड महिन्यात सकारात्मक निर्णय : मंत्री उदय सामंत यांचे आश्वासन



**देशोन्नती**

## शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा

आ. सुधाकर अडबाले यांची शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे मागणी



गडचिरोली : जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत वित्त विभागाने दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी शासन निर्णय काढला. ...

नगरपरीषदेच्या संच मान्यतेकडेही वेधले लक्ष

**The Hitavada**

Vidarbha Line | 2025-04-04 | Page- 7

## 'Release pending arrears of ashram school staffers'

■ Chandrapur Bureau

CHANDRAPUR, Apr 3

WITH THE initiative of MLC Sudhakar Adbale, Sarakaryavah of Vidarbha Madhyamik Shikshak Sangh, a meeting of teaching and non-teaching employees under Tribal Development Department was arranged with the State Tribal Development Minister Dr Ashok Uike to resolve their issues, the other day.



Sudhakar Adbale discussing with the official during the meeting.

... result and more. Meanwhile, Dr Ashok Uike assured to do the needful regarding resolving the issues of the teachers and non-teaching employees working in the Ashram School. Jitendra Naik, Minister of State, Tribal Development Department, Vijay Waghmare, Secretary, Leena Bansode, Commissioner, Jitendra Choudhary, Additional ...

**नवराष्ट्र**

www.navarashtra.com

माहिती ● महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या पाठपुराव्याला अखेर आले यश

## पेन्शन विकल्प देण्यास एक वर्षाची मुदतवाढ



**देशोन्नती**

## निप्पॉन डेंड्रो प्रकल्पग्रस्तांना अनुदान द्या : आमदार सुधाकर अडबाले यांची विधान परिषदेत मागणी

देशोन्नती वृत्तसंकलन



चंद्रपूर : भद्रावती तालुक्यातील निप्पॉन डेंड्रो प्रकल्पग्रस्तांना सानुग्रह अनुदान व नोकरी देण्यात यावी, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी विधानपरिषदेत केली आहे.

**लोकमत समाचार**

## शिक्षकों के लिए पुरानी पेंशन योजना लागू की जाए: अडबाले



शिक्षा मंत्री दादा भुसे को पत्र देते हुए विधायक सुधाकर अडबाले.

लोकमत समाचार सेवा

चंद्रपुर : वित्त विभाग ने पुरानी पेंशन योजना के क्रियान्वयन के संबंध में अधिसूचना जारी की है. सरकार ने 2 फरवरी 2024 को यह निर्णय लिया है. ...

**पुण्य नगरी**

## शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करा

आ. सुधाकर अडबाले यांची मागणी

पुण्य नगरी / प्रतिनिधी



**देशोन्नती**

## चंद्रपूरच्या तत्कालिन शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण निलंबित

आमदार सुधाकर अडबाले यांच्या तारांकित प्रश्नानंतर कारवाई, निलंबनाच्या कारवाईने अधिकारी वर्गात खळबळ

देशोन्नती वृत्तसंकलन





# विधिमंडळात मांडलेले ठळक व महत्त्वाचे मुद्दे

**राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना टप्पा वाढ अनुदान मंजूर करण्याबाबत**
**यशस्वी मागणी**

या महत्त्वाच्या मागणीनंतर १४ ऑक्टोबर २०२४ नुसार वाढीव टप्पा अनुदानाबाबत दि. १८ जुलै २०२५ रोजी पावसाळी अधिवेशनात शिक्षणमंत्री श्री. दादाजी भुसे यांनी ९७० कोटी रूपये मंजूर केल्याची घोषणा केली.

**राज्यातील बोगस शिक्षक पदभरती प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करण्याबाबत** पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये मागणीला यश

**शिक्षकांची गळचेपी करणारा संचमान्यतेचे सुधारित निकषाबाबत शासन निर्णय रद्द करण्याबाबत** प्रत्येक अधिवेशनात आग्रही मागणी

**राज्यातील शिक्षकांना १०, २०, ३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना तत्काळ लागू करण्याबाबत** प्रत्येक अधिवेशनात आग्रही मागणी

**राज्यातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत** प्रत्येक अधिवेशनात आग्रही मागणी

**नक्षलग्रस्त / आदिवासी भागातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १५% प्रोत्साहन भत्ता ६ व ७ व्या वेतन आयोगानुसार मिळण्याबाबत** अर्थसंकल्पीय / पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये मागणी

**शिक्षणाधिकारी (माध्य.) यवतमाळ यांच्या कार्यालयातील अनियमिततेची चौकशी करण्याबाबत** अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये मागणी

**राज्यातील शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करण्याबाबत**
अधिवेशनात सतत मागणी

**आदिवासी विभागातील शिक्षकांवर अन्याय करणारा "काम नाही, वेतन नाही" शासन निर्णय रद्द करण्याबाबत**
अधिवेशनात सतत मागणी

**नियुक्ती दिनांकापासून विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या ११५५ शिक्षकांना थकबाकी अदा करण्याबाबत** अर्थसंकल्पीय / पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये मागणी

**दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नगर पालिका / महानगरपालिका सेवेत रूजू झालेल्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पेंशन योजना लागू करण्याबाबत** पावसाळी अधिवेशन २०२४ मध्ये मागणी

**नागपूर खंडपीठाने दिलेल्या निकालानुसार शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत**
अधिवेशनात सतत मागणी

**नऊ कोटींच्या थकीत महागाईभत्ता वितरणात गैरव्यवहार झाल्याबाबत**
अर्थसंकल्पीय / पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये मागणी

**इंग्रजी (सीबीएसई) माध्यमाच्या शाळेतील शिक्षक - कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन देण्याबाबत** अधिवेशनात सतत मागणी

**आरटीई २००९ अंतर्गत शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची थकबाकी मिळण्याबाबत**
अधिवेशनात सतत मागणी

**ओबीसी-भटके विमुक्त व एसबीसी समुदायातील पीएचडी संशोधकांची फेलोशिप प्रलंबित असल्याबाबत** पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये मागणी

**शेतीस २४ तास वीजपुरवठा, पांदण रस्ते व शेतकऱ्यांना हेक्टरी ४० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याबाबत**
अधिवेशनात मागणी

**विजाभज आश्रमशाळा शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा प्रोत्साहन भत्ता व एकस्तर पदोन्नती पूर्ववत सुरू करून त्यांची थकबाकी देण्याबाबत**
अधिवेशनात मागणी

# विधिमंडळात मांडलेले ठळक व महत्त्वाचे मुद्दे

**गडचिरोली जिल्ह्यात गोंडवाना विद्यापीठ परिक्षेत्राकरिता स्वंतत्र उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक कार्यालय निर्माण करणेबाबत**
अधिवेशनात मागणी

**नागपूर व अमरावती विभागातील सेवानिवृत्त ग्रंथपाल यांचे अर्जीत रजा रोखीकरणाचे लाभ मिळण्याबाबत**
अधिवेशनात मागणी

**आदिवासी उपयोजन क्षेत्रातील (1901) शाळा / तुकडीवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्याबाबत**
अधिवेशनात मागणी / पाठपुरावा

**आदिवासी विभागामार्फत बाह्ययंत्रणेमार्फत पदभरतीचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत**
पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये मागणी

**DCPS/NPS खाते नसलेल्या शिक्षक-कर्मचाऱ्यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे प्रलंबित सर्व हप्ते तत्काळ अदा करण्याबाबत** अधिवेशनात सतत मागणी

**२४ नोव्हेंबर २००१ पुर्वीची मान्यता असलेल्या राज्यातील ७८ वरिष्ठ महाविद्यालयांना तत्काळ अनुदान देण्याबाबत** पावसाळी अधिवेशन २०२४ मध्ये मागणी

**आयटीआय प्राचार्य वर्ग २ व वर्ग ३ पदांच्या पदोन्नती प्रक्रिया राबविण्याबाबत**
अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये मागणी

**राज्यातील माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत**
अधिवेशनात मागणी


धरणे...
धरणे आंदोलन
धरणे...
१) टप्पा अनुदान शाळांना, अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद करा
२) दि.१ नोव्हेंबर २००५ पुर्विच्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागु करा
३) संच मान्यतेचा जाचक जीआर रद्द करा
४) समग्र शिक्षा अभियानातील कर्मचारी यांना कायम करा.
10:34:25


शेतमालाला कवडी मोलभाव सरकार खातय हमीभाव
कंत्राटदार तुपाशी शेतकरी उपाशी
निवडणूक सरली कर्जमाफी विसरली
बळीराजा त्रस्त सत्ताधारी मस्त
शेतकरी वाऱ्यावर कंत्राटदार राज्याच्या तिजोरीवर
शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी झालीच पाहिजे



# विधिमंडळातील मागील एक वर्षातील पाठपुराव्याला आलेले यश






सामना

## राज्यातील बोगस शिक्षक भरती घोटाळ्याची एसआयटी चौकशी

*राज्यात* शिक्षक भरती बंदी असतानाही नागपूर आणि अनेक जिल्ह्यांतील शाळांमध्ये २०१९ ते २०२५ या काळात सर्वाधिक बोगस शालार्थ आयडी तयार करण्यात आले. या प्रकरणी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून १० ते ३० लाख रुपये उकळले. तसेच या शिक्षकांना ५ वर्षे वेतनही देण्यात आले. या बोगस शिक्षक भरती घोटाळ्याची व्याप्ती पाहता या प्रकरणी राज्यस्तरीय एसआयटी स्थापन करून सखोल चौकशी केली जाईल, असे आश्वासन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले.

विधान परिषदेत याबाबत सुधाकर अडबाले यांनी तीन समित्यांनी अहवाल दिल्यानंतर कारवाई का झाली नाही, १८ पेक्षा जास्त अधिकारी, कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे त्यांना बडतर्फ करणार का, त्यांची संपत्ती जप्त करणार का, नागपूर नाही तर राज्यभरात हा घोटाळा झाला असून याप्रकरणी एसआयटी नेमून चौकशी करावी, दोषींना अटक करावी, अशी मागणी सुधाकर अडबाले यांनी सरकारकडे केली. त्यावर पंकज भोयर यांनी उत्तर दिले. चर्चेत प्रवीण दरेकर, एकनाथ खडसे, संदीप जोशी, परिणय फुके, अभिजीत वंजारी यांनी भाग घेतला.

**चौकशी समितीत यांचा समावेश**

पोलीस, शिक्षक उपसंचालकांकडून याची चौकशी सुरू आहेच. पण सदस्यांनी मागणी केल्यामुळे याप्रकरणी लवकरात लवकर आयएएस दर्जाचा, आयपीएस दर्जाचा आणि शक्य झाल्यास न्यायालयाच्या व्यवस्थापनातला अधिकारी यांची नियुक्ती करून एक राज्यस्तरीय एसआयटी स्थापन करण्यात येईल, असे भोयर म्हणाले.

## राज्यस्तरीय एसआयटी करणार बोगस शिक्षक भरती व शालार्थ आयडी घोटाळ्याची चौकशी

नागपूर विभागातील शिक्षक पदभरती घोटाळा, शालार्थ आयडी घोटाळ्याने राज्यात खळबळ उडाली आहे. या घोटाळ्याची व्याप्ती नागपूर विभागासह संपूर्ण राज्यात आहे. त्यामुळे राज्यातील बोगस शिक्षक पदभरती / शालार्थ आयडी प्रकरणाचा तपास एसआयटीमार्फत करावा. यात गृह, शिक्षण विभागातील निवृत्त अधिकारी व उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांचा समावेश करण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी पावसाळी अधिवेशनात ४ जुलै २०२५ रोजी विधानपरिषदेत तारांकित प्रश्नाद्वारे केली. सदर प्रकरणाची प्रशासकीय, पोलिस विभागामार्फत चौकशी सुरू आहे. या प्रकरणाची व्याप्ती बघता राज्यस्तरीय एसआयटी नियुक्त करून यात आयएएस, आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांसह न्यायालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येणार असल्याचे शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी उत्तर देतांना सांगितले. याबाबत घोटाळा उघडकीस आल्यापासून या घोटाळ्याची आमदार सुधाकर अडबाले यांनी विशेष तपास पथकाद्वारे (एसआयटी) चौकशी करण्याची मागणी सातत्याने लावून धरली होती.

सभागृहातील व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

## राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना टप्पा वाढ अनुदान मंजूर




राज्यातील अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ अनुदान मंजूर करण्याबाबत पावसाळी अधिवेशन २०२४ मध्ये आमदार सुधाकर अडबाले यांनी प्रश्न उपस्थित केला होता. दरम्यान, १२ जुलै २०२४ रोजी शिक्षणमंत्र्यांनी टप्पा वाढ अनुदान मंजूर करण्याबाबत सभागृहात घोषणा केली होती. मात्र, शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला नव्हता. त्याबाबत आमदार अडबाले यांनी सतत पाठपुरावा केला. त्यानंतर १४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. मात्र, अनेक महिने लोटूनही शासन निर्णयानुसार निधीची तरतूद शासनाने केलेली नाही. याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ व शासन स्तरावर पाठपुरावा सुरु होता.

पावसाळी अधिवेशन २०२५ पूर्वीपासून शिक्षक समन्वय संघाच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन सुरू होते. दरम्यान ८ व ९ रोजी राज्यभर शाळाबंद आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने सक्रिय पाठिंबा देण्यात आला होता. तसेच पावसाळी अधिवेशनात ८ जुलै २०२५ रोजी १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत सभागृहात मागणी लावून धरली. त्यानंतर त्याच दिवशी आझाद मैदान मुंबई येथे सुरु असलेल्या आंदोलनाला भेट देत इतर आमदारांसह स्वतः रात्री उशिरापर्यंत आंदोलनास बसले. रात्री उशिरा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांची भेट घेण्यास बंगल्यावर गेले. पण त्यांची भेट झाली नाही. ९ जुलै २०२५ रोजी आझाद मैदानावर हजारोंच्या संख्येने सुरु असलेल्या आंदोलनाची दखल घेत टप्पा अनुदानासाठी निधीची तरतूद करण्याबाबत पुरवणी मागण्यावर बोलताना शासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर सर्व शिक्षक व पदवीधर आमदारांनी विधान भवनात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची भेट घेऊन चालू अधिवेशन काळातच टप्पा अनुदान निधीची तरतूद करावी, अशी मागणी केली. १८ जुलै २०२५ ला टप्प्यावरील शिक्षकांसाठी निधीची तरतूद करून शिक्षकांना न्याय दिला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सांगितले. दि. १८ जुलै २०२५ रोजी १४ ऑक्टोबर २०२४ नुसार वाढीव टप्पा अनुदानाबाबत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी ९७० कोटी रूपये मंजूर केल्याची घोषणा केली.

सभागृहातील टप्पा अनुदानाबाबत व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

### चंद्रपूरच्या तत्कालिन शिक्षणाधिकारी (माध्य.) निलंबित



चंद्रपूरच्या तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती कल्पना चव्हाण यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या अनियमिततेची झालेल्या चौकशीवर त्यांना तात्काळ निलंबित करावे व त्यांच्या संपत्तीची एसआयटीमार्फत चौकशी करावी, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी पावसाळी अधिवेशन २०२४ मध्ये ५ जुलै २०२४ रोजी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून केली होती. आठवडाभरात त्यांचा खुलासा प्राप्त होताच निलंबित करू, असे स्पष्ट उत्तर सभागृहात तत्कालिन शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिले होते. त्यानुसार शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे सहसचिव यांनी चंद्रपूरच्या तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती कल्पना चव्हाण यांना शासन सेवेतून निलंबित करण्याची कारवाई २६ ऑगस्ट २०२४ रोजी केली. या कारवाईमुळे शालेय शिक्षण विभागातील अधिकारी वर्गांत खळबळ उडाली आहे. यासोबतच आमदार सुधाकर अडबाले यांच्या तक्रारीवरून विदर्भातील बेशिस्त शिक्षणाधिकारी / अधिकारी यांचीही चौकशी सुरू असून लवकरच त्यांच्यावर देखील अशाच प्रकारची कारवाई होईल.

सभागृहातील व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

### नागपूर व अमरावती विभागात लागले संच मान्यता दुरुस्ती कॅम्प

राज्यातील अनेक शाळांची संचमान्यता झाली नसल्याने मोठ्या प्रमाणावर शिक्षक अतिरिक्त ठरत आहे. त्यामुळे प्रलंबित संचमान्यता दुरुस्तीचे कॅम्प लावण्याची मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षण आयुक्तालय, पुणे येथे २९ ऑगस्ट २०२४ रोजी मा. आयुक्त (शिक्षण) यांच्यासोबत झालेल्या बैठकीत लावून धरली होती. त्यावर कॅम्प लावण्याचे आयुक्तांनी मान्य करीत नागपूर विभागाचा १२ व १३ सप्टेंबर २०२४ रोजी तर अमरावती विभागाचा १८ व १९ सप्टेंबर २०२४ रोजी कॅम्प लावून त्याबाबतचा अहवाल नागपूर १५ सप्टेंबर तर अमरावती २० सप्टेंबरला शिक्षण उपसंचालक यांनी सादर करण्याचे निर्देश आयुक्त (शिक्षण) यांनी दिले. त्यानुसार नागपूर व अमरावती विभागात कॅम्प लावण्यात आले. या कॅम्पमध्ये बरीच संच मान्यता दुरुस्ती प्रकरणे निकाली काढण्यात आली.

## विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या शिक्षकांना थकबाकी अदा

राज्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत अनुदानित आश्रमशाळेतील विशेष खास बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या १४३३ कर्मचाऱ्यांचे थकबाकी वेतन अदा करण्यात यावी, याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये २४ मार्च २०२५ रोजी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर मंत्री महोदयांनी बैठक घेऊन सदर विषय निकाली काढण्यात येईल, असे सांगितले. त्यानुसार आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासोबत लोहगड बंगला, मुंबई येथे २५ मार्च २०२५ रोजी बैठक पार पडली. यात सदर विषयावर सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश मंत्री डॉ. उईके यांनी सचिव, आयुक्त यांना दिले होते. त्यानुसार आयुक्त, नाशिक यांनी ११५५ शिक्षकांना थकबाकी देण्याबाबतचा प्रस्ताव मा. सचिव, आदिवासी विकास, मुंबई यांना पाठविला आहे. यावर लवकरच निर्णय होईल.

सभागृहातील लक्षवेधीचा व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

## आश्रमशाळा शिक्षकांना एकस्तर पदोन्नती योजना सुरू

राज्यातील इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या अनुदानित विजाभज आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती व प्रोत्साहन भत्ता सुरू करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये लक्षवेधीद्वारे मागणी केली होती. अखेर शासनाने दखल घेऊन सदर मागणी मंजूर करून त्याबाबतचा शासननिर्णय दिनांक ०४ जून २०२५ रोजी निर्गमित केला. त्यामुळे राज्यातील अनुदानित विजाभज आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## कार्यरत / सेवानिवृत्त शिक्षक - कर्मचाऱ्यांचे वेतन झाले दिवाळीपूर्वी

दि. २९ ऑक्टोंबर २०२४ पासून दिवाळीचा सण सुरु होत असल्याने कार्यरत / सेवानिवृत्त शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे माहे ऑक्टोंबरचे वेतन दिनांक २९ ऑक्टोंबरपूर्वी त्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत वेतन अनुदान तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, आदिवासी विकास, इतर मागास बहु. कल्याण विभागाचे प्रधान सचिव, आयुक्त यांच्याकडे १३ व १४ ऑक्टोबर २०२४ रोजी मागणी केली होती. त्यानुसार वित्त विभागाने २४ ऑक्टोबर २०२४ रोजी कार्यरत/सेवानिवृत्त कर्मचारी यांचे माहे ऑक्टोबर २०२४ चे वेतन २५ ऑक्टोबर २०२४ पूर्वी करण्याबाबत शासन परिपत्रक निर्गमित केले.

## केंद्रप्रमुख भरतीपरीक्षेचा मार्ग मोकळा

शासनाने जून २०२३ मध्ये राज्यातून २४०० जागांसाठी केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षेची जाहिरात काढली. त्यासाठी राज्यभरातून सुमारे ५४८२१ पात्र शिक्षकांनी परीक्षा अर्ज सादर केले. सदरची परीक्षा जून २०२३ मध्ये होणार होती. मात्र, जवळपास २ वर्ष उलटूनही केंद्रप्रमुख सेवाप्रवेश नियम बदल न झाल्यामुळे ही परीक्षा होऊ शकली नव्हती. याबाबत महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने राज्यभरातून तक्रारी प्राप्त झाल्या. याची तात्काळ दखल घेत विधान भवनात ग्रामविकास मंत्री श्री. गोरे यांची भेट घेऊन मागणीची गंभीरता लक्षात आणून देत निवेदन दिले. सोबतच पावसाळी अधिवेशन २०२५ मध्ये १७ जुलै २०२५ रोजी सभागृहात अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना अधिसूचना तात्काळ निर्गमित करण्याबाबत मागणी लावून धरली. त्यानंतर दि. १८ जुलै २०२५ रोजी केंद्रप्रमुख परीक्षेसंदर्भात प्रलंबित असलेली अधिसूचना निर्गमित करण्यात आली. यामुळे परीक्षेद्वारे केंद्रप्रमुख होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या राज्यातील ५२,००० जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांचा मार्ग मोकळा झाला आहे.

सभागृहातील व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

## वरिष्ठ / निवड श्रेणी प्रशिक्षण

राज्यातील मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक शाळांतील कार्यरत शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी/ निवड श्रेणीचे प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पूणेचे संचालक यांच्याकडे ७ मार्च २०२५ रोजी मागणी केली होती. त्यानुसार संचालक यांनी ११ एप्रिल २०२५ रोजी १५ एप्रिल २०२५ पासून नोंदणी व प्रशिक्षण कार्यक्रम घोषित करण्याबाबत पत्र निर्गमित केले व त्यानुसार प्रशिक्षण पार पडले.

## शिक्षकांना निवडणुकीत कर्तव्य पार पाडताना सुविधा उपलब्ध



विधानसभा निवडणूक २०२४ साठी नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कर्तव्य पार पाडतांना विविध सुविधा उपलब्ध करण्याबाबत २० ऑक्टोबर २०२४ रोजी नागपूर विभागीय आयुक्त यांची भेट घेऊन मागणी केली होती. त्यानुसार आमदार अडबाले यांच्या पत्राचा संदर्भ देऊन विभागीय आयुक्तांनी नागपूर विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले.

## विकल्प भरण्यास १ वर्षाची मुदतवाढ



जीपीएस/युपीएस योजनेची कार्यपद्धती निर्गमित होईपर्यंत विकल्प भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान वित्त विभागाच्या प्रधान सचिव डॉ. रिचा बागला यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे १९ मार्च २०२५ रोजी मागणी केली होती. त्यानुसार वित्त विभागाने २८ मार्च २०२५ रोजी शासन निर्णय काढून विकल्प भरण्यास ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

## परप्रांतीय कामगारांची पोलीस पडताळणी अनिवार्य

चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय कामगारांना पोलीस पडताळणी न करता थेट कामावर घेण्यात येत असल्याची गंभीर बाब आमदार सुधाकर अडबाले यांनी गृहमंत्र्यांना १३ जानेवारी २०२५ रोजी निदर्शनास आणून दिली होती. याची दखल घेत गृह विभागाच्या उपसचिवांनी १३ मे २०२५ रोजी महाराष्ट्र पोलीस महासंचालक आणि चंद्रपूर पोलीस अधीक्षक यांना औद्योगिक क्षेत्रात परप्रांतीय कामगारांची नियुक्ती करताना पोलिस पडताळणी अनिवार्य करण्यात यावी व याबाबत सर्व पोलिस घटकांना सुचित करण्यात यावे, असे निर्देश दिले.

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२४-२५ मध्ये नोंदणीस मुदतवाढ

राज्यातील सर्व नवोपक्रमशील शिक्षक व अधिकाऱ्यांच्या कल्पकतेला व सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी परिषदेमार्फत राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेस ४ नोव्हेंबर ते २० नोव्हेंबर २०२४ पर्यंत ऑनलाईन नोंदणीस मुदत देण्यात आलेली होती. नोंदणीस १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी आमदार सुधाकर अडबाले यांनी संचालकांकडे १९ नोव्हेंबर २०२४ रोजी केली होती. मागणीची दखल घेत २० नोव्हेंबर २०२४ रोजी नोंदणीस ५ डिसेंबर २०२४ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

## आदिवासी आश्रमशाळांची वेळ पूर्वीप्रमाणेच

राज्यातील शासकीय व अनुदानित आदिवासी आश्रमशाळांची वेळ पूर्वीप्रमाणे करण्यात यावी, याबाबत सभागृहात सतत मागणी तसेच आदिवासी मंत्री डॉ. अशोकजी उईके यांची चंद्रपूर येथे प्रजासत्ताक दिनी भेट घेऊन निवेदनाद्वारे मागणी केली होती. यावर लवकरच बदल करण्यात येणार असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले होते. त्यानुसार परिपत्रक काढून आश्रमशाळांची वेळ पूर्वीप्रमाणे सकाळी ११ ते ५ वाजेपर्यंत करण्यात आली.

## शाळा बंद; १३ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन

वर्धा जिल्ह्यातील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, साईनगर वर्धा द्वारा संचालित (१०० टक्के अनुदानित) सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळा साईनगर, सावित्रीबाई फुले विद्यालय मासोद, सावित्रीबाई फुले विद्यालय झाडगाव, सावित्रीबाई फुले विद्यालय, सिंदी (मेघे) या शाळांचा समावेश होता. या सर्व शाळा अचानकपणे मार्च २०२४ मध्ये संचालक मंडळाने शैक्षणिक सत्र जुलै २०२४ पासून बंद करीत असल्याबाबतचा नियमबाह्य निर्णय घेतला. तसे पत्र शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव, शिक्षण संचालक (प्राथ./माध्य.), शिक्षण उपसंचालक नागपूर, शिक्षणाधिकारी प्राथमिक / माध्यमिक, वर्धा यांना पाठविले. पत्र बघताच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना धक्का बसला. सर्वांनी संचालक मंडळाची भेट घेवून शाळा बंद करू नये, अशी विनंती केली. मात्र, संस्थेने ऐकले नाही. यादरम्यान जुलै २०२४ पासून चारही शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन सुद्धा बंद झाले. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट सोबतच नोकरीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला. याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी, मी व विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, तुम्ही काळजी करू नका, असा धीर दिला. या प्रकरणाबाबत मंत्रालय मुंबई, आयुक्त (शिक्षण), संचालक स्तरावर सतत पाठपुरावा केल्यानंतर या चारही शाळांतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा मार्ग मोकळा झाला. डिसेंबर २०२४ मध्ये वर्धा जिल्ह्यातील विविध तालुक्यातील अनुदानित शाळांमध्ये सर्व १३ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे समायोजन झाले. सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचविल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांनी आभार मानले.

## नागपूर न्यायाधिकरण येथे पीठासीन अधिकारी नियुक्त

नागपूर स्थित विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण येथील पीठासीन अधिकारी सेवानिवृत्त झाल्याने गेल्या ५ महिन्यांपासून पद रिक्त होते. रिक्त पीठासीन अधिकारी पद नियुक्त करण्याबाबत उच्च शिक्षण मंत्री, अवर मुख्य सचिव यांची भेट घेऊन मागणी केली होती. त्यानुसार १७ एप्रिल २०२५ रोजी शासनाने आदेश काढून पिठासीन अधिकारी नियुक्त केल्याने मागणीला यश आले आहे. नियमित पीठासीन अधिकारी नियुक्त करण्याबाबत पावसाळी अधिवेशात १४ जुलै २०२५ रोजी उच्च शिक्षण मंत्र्यांकडे मागणी केली आहे.

## थकीत देयके शालार्थ प्रणालीमधून ऑनलाईन सादर करण्यास मुदतवाढ

थकीत वेतन व इतर देयके शालार्थ प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत दि. २५.०९.२०२४ रोजीची मुदत देण्यात आली होती. त्यास मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी २४ सप्टेंबर २०२४ रोजी मा. आयुक्त (शिक्षण) व शिक्षण संचालक (माध्य.) यांच्याकडे केली होती. मागणीची दखल घेत मा. संचालक पूणे यांनी पत्र निर्गमित करून ५ ऑक्टोबर २०२४ रोजीपर्यंत मुदतवाढ दिली.

## मुळ/दुय्यम सेवा पुस्तकातील नोंदी अद्यावत व माध्यमिक शिक्षकांना 4800 ग्रेड पे लागू

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प गडचिरोलीअंतर्गत आश्रमशाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्यांबाबत समस्या निवारण सभा २५ सप्टेंबर २०२४ रोजी प्रकल्प कार्यालय सभागृह, गडचिरोली येथे पार पडली. या बैठकीत गडचिरोली प्रकल्पातील माध्यमिक शिक्षकांना 4800 ग्रेड पे लागू करण्याबाबत व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मुळ/दुय्यम सेवा पुस्तकातील नोंदी अद्यावत करण्याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार २६ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मुळ/दुय्यम सेवा पुस्तकातील नोंदी अद्यावत करण्याबाबत व गडचिरोली प्रकल्पातील माध्यमिक शिक्षकांना 4800 ग्रेड पे लागू करण्याबाबत प्रकल्प कार्यालयाकडून पत्र निर्गमित करण्यात आले.

## प्राध्यापकांचे सात महिन्यांचे थकीत वेतन प्राप्त

मोहसीनभाई जव्हेरी महाविद्यालय, देसाईगंज (जि. गडचिरोली) येथील प्राध्यापकांचे तब्बल सात महिन्यांचे वेतन थकीत होते. त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले होते. ही गंभीर बाब पुढे येताच आमदार सुधाकर अडबाले यांनी विद्यापीठ प्रशासन व सहसंचालक उच्च शिक्षण, मंत्रालय स्तरावर सतत पाठपुरावा केला. यामुळे सदर प्राध्यापकांचे सात महिन्यांचे थकीत वेतन विद्यापीठामार्फत प्राप्त झाले आहेत. आमदार सुधाकर अडबाले यांच्या या कार्याबाबत गोंडवाना विद्यीठ, गडचिरोली प्रशासनाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक संकीर्ण २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ.)

(कुलसचिव यांचे कार्यालय)

डॉ. अनिल हिरेखण
एम.बी.ए., पीएच.डी.
कुलसचिव

दुरध्वनी - ०७१३२-२२३१०४
ई-मेल: gug.registrar@gmail.com
registrar@unigug.ac.in

क्रमांक/गों.वि./कुसका/ 1951

दिनांक : 4/3/2025.

प्रति,
मा. ना. श्री. सुधाकर अडबाले ,
मा. सदस्य, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य,

विषय:- अभिनंदन पत्र.

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मोहसिनभाई जव्हेरी महाविद्यालयातील प्राध्यापकांचे वेतन प्रकरणी विद्यापीठ स्तरावर, मा. सहसंचालक कार्यालयाचे स्तरावर आणि मंत्रालय स्तरावर आपण वेळोवेळी केलेल्या पाठपुरव्याबद्दल दि. २४ डिसेंबर, २०२४ व दि. ०८ जानेवारी, २०२५ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या सभेमध्ये आपल्या अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. उक्त प्रकरणी उक्त प्रकरणी आपल्या कार्याबाबत विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने आपले अभिनंदन करण्यात येत आहे.

धन्यवाद!

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## 'मंथन'च्या कार्यक्रमासाठी शिक्षकांना सक्ती रद्द

मंथन या खासगी संस्थेतर्फे आयोजित शिक्षक परिसंवादाला नागपूर विभागातील सर्व विद्यापीठाद्वारे संचालित महाविद्यालयामधील प्राचार्य व अधिव्याख्याता यांना सदरील कार्यक्रमामध्ये सहभागी होणे अनिवार्य करण्यात आले होते. यावर आमदार सुधाकर अडबाले यांनी भ्रमणध्वनी व पत्र देताच उच्च शिक्षण विभाग नागपूरचे सहसंचालक यांनी सुधारित पत्र काढून त्यातून 'अनिवार्य' हा शब्द वगळण्यात आला. व शिक्षकांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.



शिर्डी

# जुन्या पेंशन योजनेसाठी आग्रही भूमिका

१५ सप्टेंबर २०२४

* १ नोव्हेंबर २००५ नंतर लागलेल्या व टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळांतील कार्यरत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी व राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागणीसाठी सुधाकर अडबाले हे आमदार होण्यापूर्वीपासूनच आग्रही भूमिका घेऊन लढा देत होते. २७ डिसेंबर २०२२ रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनादरम्यान काढण्यात आलेल्या भव्य मोर्चात ते सहभागी झाले होते.

* जानेवारी २०२३ मध्ये झालेल्या नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीत महाराष्ट्र राज्य जुनी पेंशन संघटनेचे पुरस्कृत उमेदवार म्हणून सुधाकर अडबाले यांनी निवडणूक लढविली आणि विक्रमी मतांनी विजयी झाले. ८ फेब्रुवारी २०२३ रोजी जुन्या पेंशनची टोपी आणि दुपट्टा घालून विधानपरिषद सदस्य पदाची शपथ घेतली. तेव्हापासून प्रत्येक अधिवेशनात जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबत आग्रही भूमिका ते सभागृहात मांडत आहेत.

* १४ मार्च २०२३ पासून सुरु झालेल्या आंदोलनाची माहिती पहिल्याच अधिवेशनात १५ मार्च २०२३ रोजी सभागृहात दिली आणि मागणी लावून धरली. पेंशन फायटर्सच्या आंदोलनाची दखल घेत वित्त विभागाने काढलेल्या दि. ३१ मार्च २०२३च्या कुटुंब निवृत्तीवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला रुग्णता निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्ती उपदान मिळण्याबाबतच्या शासन निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात कार्यपद्धती व शालेय शिक्षण, ग्रामविकास व इतर विभागाचा स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाचा १४ जून २०२३ रोजी

रामलिला मैदानावर केलेल्या भाषणाचा व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा



सभागृहातील जुनी पेंशनबाबत व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

* १ ऑक्टोंबर २०२३ रोजी रामलिला मैदान, दिल्ली येथे झालेल्या पेन्शन शंखनाद महारॅलीमध्ये देशभरातील विविध राज्यांतून जवळपास १० लाख पेंशन फायटर्स सहभागी झाले होते. या विराट महारॅलीत जुनी पेन्शन योजना लागू होईपर्यंत आपण स्तब्ध बसणार नाही, असा निर्धार पेन्शन शंखनाद महारॅलीमध्ये आमदार सुधाकर अडबाले यांनी संबोधित करताना केला.

* १२ डिसेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने हिवाळी अधिवेशनादरम्यान आयोजित पेन्शन जनक्रांती महामोर्चास यशवंत स्टेडियम, नागपूर येथे उपस्थित राहून पेन्शन फायटर्संना संबोधित केले.

* दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व १ नोव्हेंबर २००५ नंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यभरातील सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना व १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या राज्यातील सर्व शिक्षक व राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी २७ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्याकडे केली.

* मा. मुख्यमंत्री यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन २०२३ मध्ये सभागृहात २६ हजार कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे मान्य केले होते. २ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयात दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/ अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रूजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात आली आहे. मात्र, सदर शासन निर्णयात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना डावलण्यात आल्याने सदर कर्मचाऱ्यांवर झालेला फार मोठा अन्याय असल्याचे पावसाळी अधिवेशनात






११ जुलै २०२४ रोजी शासनाचे लक्ष वेधले. तसेच दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयावर सर्व विभागाने स्वतंत्र शासन निर्णय काढण्याबाबत पाठपुरावा केला.

✻ १५ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने शिर्डी येथे आयोजित पेन्शन राज्य महाअधिवेशनास उपस्थित राहून राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले पेन्शन फायटर्स यांना मा. उध्दवजी ठाकरे, मा. नानाभाऊ पटोले यांच्यासह आमदार सुधाकर अडबाले यांनी मार्गदर्शन केले. यावेळी खासदार व आमदारांनी हजेरी लावली होती.

✻ २ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना च्या वतीने १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करावी, या प्रमुख मागणीसाठी महात्मा गांधीजी यांच्या जयंतीपासून वर्धा येथे आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. या उपोषणास भेट देऊन मार्गदर्शन केले. त्यानंतर पून्हा ५ ऑक्टोबर २०२४ रोजी या उपोषणास भेट देऊन उपोषणकर्त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली. उपोषणाचा पाचवा दिवस असून १७ पेन्शन शिलेदार आमरण उपोषण करीत असून काहींची प्रकृती खालावल्यानंतरही शासनाच्या वतीने दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे शासनाची भूमिका स्पष्ट करा अन्यथा रस्ता रोको आंदोलन केले जाईल, असा इशारा देताच जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रतिनिधी म्हणून पाठविले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाची भूमिका मांडून शासनाकडे आपल्या मागण्यांबाबत



वर्धा

५ ऑक्टोबर २०२४

सभागृहातील व्हिडीओ
बघण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा

सकारात्मक अहवाल पाठविला जाईल, आपण उपोषण थांबवा, अशी विनंती केली. त्यानंतर राज्याध्यक्ष वितेश खांडेकर यांच्या नेतृत्वात उपोषणाकर्त्यांनी निर्णय घेऊन आमरण उपोषण स्थगित करण्यात आल्याचे जाहीर केले. त्यानंतर आमदार सुधाकर अडबाले यांनी स्वतः सर्व उपोषणाकर्त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात नेऊन त्यांची तपासणी करवून घेतली.

✻ हिवाळी अधिवेशन २०२४ मध्ये १८ डिसेंबर २०२४ रोजी १ नोव्हेंबर २००५ रोजी नियुक्त व त्यानंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानावर आलेल्या राज्यातील शिक्षक - शिक्षकेत्तर व राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, याबाबत लक्ष वेधले.

✻ अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ मध्ये १७ मार्च २०२५ रोजी जुनी पेन्शन योजना लागू करावी, याबाबत सभागृहात मागणी लावून धरली.

✻ १९ मार्च २०२५ रोजी मुंबई येथे शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांची भेट घेतली. दि. २ फेब्रुवारी २०२४ रोजी शासन निर्णयानुसार शालेय शिक्षण विभागाने स्वतंत्र शासन निर्णय काढून शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

✻ ११ जून २०२५ रोजी २ फेब्रुवारी २०२४ च्या शासन निर्णयानुसार महाविद्यालयीन प्राध्यापकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत अवर मुख्य सचिव श्री. रेड्डी यांना निवेदन दिले.

✻ ७ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य अंशतः अनुदान प्राप्त (२००५ पूर्वी) शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे सदर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना व अन्य मागण्यांसाठी २ दिवसीय आर्त हाक आंदोलनास भेट देऊन मार्गदर्शन केले.

✻ राज्यातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राज्य कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, ही मागणी घेऊन सभागृहात विविध आयुधांच्या माध्यमातून आमदार सुधाकर अडबाले प्रश्न उपस्थित करीत असतात.



**मुंबई**

१९ मार्च २०२५ रोजी शिक्षणमंत्री श्री. दादाजी भूसे यांची भेट घेऊन निवेदन दिले.

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा उपक्रम

# समस्या तुमच्या पुढाकार आमचा

२०२३ ते २०२४

**आमदार सुधाकर अडबाले यांच्या संकल्पनेतून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ वि.मा.शि. संघाचा 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' हा अभिनव उपक्रम सुरु करण्यात आला आहे.**



# समस्या निवारण सभा

## मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्यमिक)

| जिल्हा | तारीख | जिल्हा | तारीख |
|---|---|---|---|
| चंद्रपूर - | 24-05-2023<br>01-12-2023<br>26-06-2024 | वर्धा - | 13-04-2023<br>16-02-2024<br>25-06-2024 |
| भंडारा - | 10-05-2023<br>06-10-2023<br>16-07-2024 | गडचिरोली - | 24-04-2023<br>26-10-2023<br>21-06-2024 |
| नागपूर - | 28-06-2023 | यवतमाळ - | 11-07-2023 |
| गोंदिया - | 26-06-2023<br>08-01-2024 | वाशिम - | 26-09-2023 |
| | | अकोला - | 27-09-2023 |

## शिक्षण उपसंचालक

| | |
|---|---|
| नागपूर - | 04-10-2023<br>14-06-2024 |
| अमरावती - | 23-02-2023<br>24-06-2024 |

## आयुक्त, मनपा नागपूर

| | |
|---|---|
| नागपूर - | 04-09-2023 |

## सहसंचालक, व्य.शि. व प्रशिक्षण

| | |
|---|---|
| नागपूर - | 09-02-2024 |

## सहसंचालक, उच्च शिक्षण

| | |
|---|---|
| नागपूर - | 06-06-2024 |

## विजाभज आश्रमशाळा

| | |
|---|---|
| नागपूर - | 16-05-2023 |
| चंद्रपूर - | 01-09-2023<br>13-06-2024 |

## प्रधान सचिव, इतर मागास बहु. कल्याण

| | |
|---|---|
| मुंबई - | 10-07-2024 |

## अपर आयुक्त, आदिवासी विकास

| | |
|---|---|
| नागपूर - | 19-05-2023<br>19-06-2024 |
| अहेरी प्रकल्प - | 30-10-2023 |

## कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ

| | |
|---|---|
| गडचिरोली - | 20-06-2024 |

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचा उपक्रम

# समस्या तुमच्या पुढाकार आमचा

**२०२४ ते २०२५**

**आमदार सुधाकर अडबाले यांच्या संकल्पनेतून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ वि.मा.शि. संघाचा 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' हा अभिनव उपक्रम सुरु करण्यात आला आहे.**



# समस्या निवारण सभा

## मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथ./माध्यमिक)

| जिल्हा | तारीख | जिल्हा | तारीख |
|---|---|---|---|
| चंद्रपूर - | 18-02-2025 | वर्धा - | 28-04-2025 |
| भंडारा - | 07-04-2025 | गडचिरोली - | 29-04-2025 |
| नागपूर - | 19-09-2024 | यवतमाळ - | 10-10-2024 |
| गोंदिया - | 22-08-2024<br>29-05-2024 | बुलढाणा - | 23-09-2024 |

### आयुक्त (शिक्षण), पूणे

पूणे - 29-08-2024

### मंत्री, शालेय शिक्षण

मुंबई - 04-06-2025

### मंत्री, आदिवासी विकास

मुंबई - 25-03-2025

### आदिवासी विकास विभाग

चंद्रपूर-चिमूर प्रकल्प - 18-09-2024
चंद्रपूर प्रकल्प - 17-06-2025
गडचिरोली प्रकल्प - 25-09.2024
अहेरी प्रकल्प - 26-09.2024
देवरी प्रकल्प - 07-10.2024
अमरावती - 22-07.2025

### कामगार आयुक्त, चंद्रपूर

चंद्रपूर - 28-11-2024

### विभागीय अध्यक्ष, नागपूर बोर्ड

नागपूर - 08-10-2024

### प्रादे. उपसंचालक, इ. मा. बहु. कल्याण

नागपूर - 12-02-2025

### विजाभज आश्रमशाळा

चंद्रपूर - 20-09-2024
13-06-2025

### सहसंचालक, व्य.शि. व प्रशिक्षण

नागपूर - 10-06-2025

### आयुक्त, मनपा चंद्रपूर

चंद्रपूर - 15-08-2024

### आयुक्त, मनपा नागपूर

नागपूर - 11-10-2024

# समस्या निवारण सभेत 'ऑन द स्पॉट' मान्यता



## वर्धा

वर्धा जिल्ह्यातील २८ एप्रिल २०२५ रोजी साडेसहा तास चाललेल्या समस्या निवारण सभेत मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, अनुकंपा व इतर असे एकूण १२ प्रकरणांना "ऑन द स्पॉट" मान्यतेचे पत्र देण्यात आले.

## चंद्रपूर

चंद्रपूर जिल्ह्यातील १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पाच तास चाललेल्या समस्या निवारण सभेत ३ अनुकंपा व १ उपमुख्याध्यापक पदोन्नती प्रकरणांना 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले.





## गडचिरोली

गडचिरोली : २९ एप्रिल २०२५ रोजी साडेसहा तास चाललेल्या समस्या निवारण सभेत १ मुख्याध्यापक, २ सहा. शिक्षक व १ निवड श्रेणी प्रस्तावास "ऑन द स्पॉट" मान्यतेचे पत्र देण्यात आले.

## गोंदिया

गोंदिया जिल्ह्यातील २९ मे २०२५ रोजीच्या समस्या निवारण सभेत १ अनुकंपा प्रकरणास "ऑन द स्पॉट" मान्यतेचे पत्र देण्यात आले.





**नागपूर**

नागपूर जिल्ह्यातील १९ सप्टेंबर २०२४ रोजी सहा तास चाललेल्या समस्या निवारण सभेत २ अनुकंपा, १ निवड श्रेणी, १ मुख्याध्यापक, १ ग्रंथपाल नियुक्तीस "ऑन द स्पॉट" मान्यतेचे पत्र देण्यात आले.

**नागपूर**

नागपूर : सहविचार सभेचा आढावा घेण्यासाठी ८ ऑक्टोबर २०२४ रोजी पार पडलेल्या बैठकीत जिल्ह्यातील ४ प्रकरणांना "ऑन द स्पॉट" मान्यता देण्यात आली.





**नागपूर**

नागपूर : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्यासोबत ८ एप्रिल २०२४ रोजी झालेल्या बैठकीत १ उपमुख्याध्यापक, १ कनिष्ठ लिपिक सेवक व १ अनुकंपा प्रकरणे "ऑन द स्पॉट" निकाली काढण्यात आले.

**नागपूर**

नागपूर : १६ जून २०२५ रोजी घेतलेल्या बैठकीत १ मुख्याध्यापक पदाचे मान्यतेचे पत्र 'ऑन द स्पॉट' देण्यात आले.






**पूणे** : आयुक्त (शिक्षण), पूणे येथील समस्या निवारण सभा.



**यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यातील १० ऑक्टोबर २०२४ रोजी साडेसहा तास चाललेल्या समस्या निवारण सभेत १ अनुकंपा तत्त्वाअंतर्गत नियुक्तीस ऑन द स्पॉट मान्यतेचे पत्र देण्यात आले.

## शेकडो प्रकरणे निकाली

वि.मा.शि. संघाच्या 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' उपक्रमाअंतर्गत विदर्भातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या शेकडो समस्या सोडविण्यात आल्या. जिल्हा स्तरावरील तसेच शालेय शिक्षण, आदिवासी विकास, इतर मागास बहुजन कल्याण व उच्च शिक्षण विभागातील प्रादेशिक व मंत्रालय स्तरावरील असंख्य सामुहीक व वैयक्तिक प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

**नागपूर**

८ ऑक्टोबर २०२४



**पुण्यनगरी**

## शिक्षक आमदारांच्या सभेत १२ प्रकरणे ऑन द स्पॉट निकाली

**सकाळ**

## अनुकंपाधारकांना 'ऑन द स्पॉट' मान्यता

आमदार अडबाले यांचा पुढाकार; समस्या निवारण सभेत प्रश्न निकाली

यांना मिळाले नियुक्तीपत्र

**देशोन्नती**

## 'ऑन द स्पॉट' मान्यतेचा धडाका कायम

आमदार सुधाकर अडबाले यांच्या समस्या निवारण सभेत ४ प्रकरणांना मान्यता

**नवभारत**

## सभा में 4 प्रकरणों का हुआ निपटारा

विधायक अडबाले के सहयोग से समाधान सभा संपन्न

**तरुण भारत**

## आश्रमशाळा कर्मचाऱ्यांची प्रकरणे तत्काल निकाली काढा : आ. अडबाले

सहविचार सभा

सहविचार सभेत बोलताना आ. सुधाकर अडबाले

**The Hitavada**

## Adbale directs CMC to absorb sanitary workers' kin on compassionate ground

**देशोन्नती**

कर्जाची परतफेड न करता, जीपीएफच्या रक्कमेची उचल

## समस्या निवारण सभेत शिक्षण विभागाची अनागोंदी चव्हाट्यावर

**पुण्यनगरी**

शिक्षण आयुक्तांचे आदेश — २० सप्टेंबरला कॅम्पचा घेणार आढावा

## प्रलंबित संचमान्यता दुरुस्ती कॅम्प लावून निकाली काढणार

चौकशी करून कारवाई करणार

**देशोन्नती**

## आ. अडबाले यांचा अतिसंवेदनशील भागातील शिक्षकांशी संवाद

भेटीतून जाणून घेतल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या

**लोकमत**

## अन्यायकारक 'तो' शासन निर्णय रद्द करा

सुधाकर अडबाले यांची शिक्षण राज्यमंत्री, प्रधान सचिवांकडे मागणी

## लापरवाही: नहीं बांटी 5.56 करोड़ की छात्रवृत्ति, वापस गई

वेतन के बाद का अनुदान 15 दिन में जमा होगा

**लोकमत**

सुधाकर अडबाले : प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांना निर्देश

## आश्रमशाळा शिक्षकांची प्रकरणे प्रलंबित ठेवू नका

बैठकीला यांची उपस्थिती

**पुण्यनगरी**

## जुन्या पेन्शनसाठी कर्मचाऱ्यांचा मोर्चा जिल्हा कचेरीवर धडकला

**लोकमत**

## आमदारांनी बंद पाडले कंपनीचे काम

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोबदला दिला नाही

आत्मदहनाचा शेतकऱ्यांचा इशारा

पोलिस बळाचा वापर

५५ हेक्टर

प्रकल्पग्रस्तांची मागणी

**पुण्यनगरी**

## सरकारकडे लाडक्या बहिणींसाठी पैसे आहे, शिक्षकांसाठी नाही

आमदार सुधाकर अडबाले यांची टीका

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे गोंदिया जिल्हा अधिवेशन

**तरुण भारत**

## शिक्षणोत्सवातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास

● आ. सुधाकर अडबाले यांचे प्रतिपादन ● शिक्षणोत्सव २०२४-२५चा थाटात समारोप

# मंत्र्यांसह बैठक

**मुंबई** मंत्रालय, | ४ जून २०२५



✻ शालेय शिक्षणमंत्री श्री. दादाजी भूसे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत शालेय शिक्षण विभागातील शिक्षक, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापनाच्या विविध समस्या आणि त्यांच्या उपाययोजना याबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार सुधाकर अडबाले, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त, एससीईआरटीचे संचालक व अन्य आमदार व अधिकारी उपस्थित होते.

**मुंबई** लोहगड, | २५ मार्च २०२५



✻ आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोकजी उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत लोहगड बंगला, मुंबई येथे आदिवासी विभागाअंतर्गत शासकीय / अनुदानित आश्रमशाळा शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रलंबित समस्यांबाबत बैठक पार पडली. यावेळी आमदार सुधाकर अडबाले, प्रधान सचिव, आयुक्त, व अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.



इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुलजी सावे यांना आश्रमशाळा समस्यांबाबत निवेदन देताना.



उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांना उच्च शिक्षण विभागातील समस्यांबाबत निवेदन देताना.



शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकजजी भोयर यांना शालेय शिक्षण विभागातील समस्यांबाबत निवेदन देताना.



महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांना राज्यातील शाळांचे अकृषक कर माफ करण्याबाबत निवेदन देताना.

# विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे कार्यतत्पर सरकार्यवाह

✻ विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या प्रांतीय सरकार्यवाह या पदावर २५ ऑक्टोबर २०१५ रोजी श्री. सुधाकर अडबाले यांना जबाबदारी देण्यात आली. चंद्रपूर येथे झालेल्या प्रांतीय अधिवेशनात ४ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांची पूनश्च प्रांतीय सरकार्यवाहपदी अविरोध निवड करण्यात आली.

✻ श्री. सुधाकर अडबाले सर निवडून येताच त्यांनी बैठकांचे सत्र सुरु केले. आमदार सुधाकर अडबाले यांच्या संकल्पनेतून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ वि.मा.शि. संघाचा 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' हा अभिनव उपक्रम सुरु करण्यात आला. या उपक्रमाने शैक्षणिक क्षेत्रावर सकारात्मक परिणाम झाला असून, शिक्षकांच्या आशेचा किरण अडबाले सर बनले आहेत.

✻ नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार असताना देखील विमाशि संघाचे सरकार्यवाह म्हणून नागपूर विभागासोबतच अमरावती विभागाच्या देखील बैठका घेऊन तेथील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचे कार्य आणि विमाशि संघाचे आमदार म्हणून अडबाले सर कार्यतत्पर आहेत.

✻ हिवाळी अधिवेशन नागपूर २०२४ दरम्यान १९ डिसेंबर २०२३ रोजी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्यांना घेऊन यशवंत स्टेडियम नागपूर येथे एकदिवसीय आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला उपस्थित राहून आमदार अडबाले सर यांनी मार्गदर्शन केले.

✻ २५ ऑगस्ट २०२४ रोजी अमरावती (शहर/ग्रामीण), २९ डिसेंबर २०२४ रोजी चंद्रपूर महानगर, ५ जानेवारी २०२५ रोजी गोंदिया, १२ जानेवारी २०२५ रोजी चंद्रपूर ग्रामीण, १९ जानेवारी २०२५ रोजी भंडारा, १६ फेब्रुवारी २०२५ रोजी गडचिरोली व १३ एप्रिल २०२५ रोजी पार पडलेल्या नागपूर जिल्हा (ग्रा.) अधिवेशनास आमदार सुधाकर अडबाले यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

✻ दहावी, बारावी परीक्षा केंद्राबाबतचा निर्णय तात्काळ रद्द करण्याबाबत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात नागपूर /अमरावती विभागीय






बोर्ड कार्यालयासमोर १ फेब्रुवारी २०२५ रोजी धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात येणार होते. सोबतच आमदार अडबाले यांनी राज्यातील शिक्षकांवर अविश्वास दर्शविणारा सदर निर्णय रद्द न झाल्यास बारावी व दहावी परिक्षेदरम्यान बहिष्कार आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राज्यमंडळाला दिला होता. त्यामुळे राज्यमंडळाने २९ जानेवारी २०२५ रोजी पत्रक काढून निर्णयात बदल करण्यात आला. आंदोलनातील प्रमुख मागणी मान्य करण्यात आल्याने सदर धरणे / बहिष्कार आंदोलन स्थगित करण्यात आले.

✻ २४ फेब्रुवारी २०२५ रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. यवतमाळ यांच्या कार्यालयातील अनियमिततेची चौकशी करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्य.) कार्यालयासमोर धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

✻ १८ मार्च २०२५ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२५ दरम्यान विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्यांना घेऊन नागपूर / अमरावती शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयासमोर व उर्वरित शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे कार्यालयासमोर धरणे / निदर्शने आंदोलन आले.

✻ ३१ मार्च २०२५ रोजी जळगाव येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या बैठकीस उपस्थित राहून राज्यातील ज्वलंत व संघटनात्मक बाबींवर मार्गदर्शन केले.

✻ १४ मे २०२५ रोजी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात १५ मार्च २०२५ रोजीचा संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी विदर्भातील सर्व शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे कार्यालयासमोर धरणे / निदर्शने आंदोलन आले.

✻ २७ जून २०२५ रोजी राज्यातील बोगस शिक्षक भरती घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी करावी व विदर्भातील शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्यात यावी, या मागणीसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने नागपूर / अमरावती शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयासमोर धरणे / निदर्शने आंदोलन आले.

✻ पावसाळी अधिवेशन २०२५ दरम्यान ११ जुलै २०२५ रोजी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने आमदार सुधाकर अडबाले यांच्या नेतृत्वात शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्यांना घेऊन नागपूर / अमरावती शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयासमोर व उर्वरित शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे कार्यालयासमोर धरणे / निदर्शने आंदोलन करण्यात आले.

✻ आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने 'शिक्षक संवाद' हा नवीन उपक्रम सुरु करण्यात आला. या माध्यमातून ते प्रत्येक जिल्ह्यात 'शिक्षक संवाद' आयोजित करून शिक्षकांच्या समस्या जाणून घेत आहेत. त्यानंतर संबंधित विभागात 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या उपक्रमांतर्गत बैठक आयोजित करून समस्या सोडविल्या जात आहेत.

# मृत कामगाराच्या कुटुंबियांना मिळवून दिले ७० लाख रुपये आणि इतर देय लाभ

चंद्रपूर येथील धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीमध्ये १२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २.१५ वाजता कर्णधर अशोक शेरके (वय ३६, रा. भिवापूर वॉर्ड, चंद्रपूर) या कामगाराचा कोल हँडलिंग प्लांटमध्ये मृत्यू झाला. त्यानंतर सदर कामगाराच्या कुटूंबियांना कुठलाही मोबदला न देता कंपनी व्यवस्थापनाचा मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न कामगारांनी हाणून पाळला.

आमदार सुधाकर अडबाले नागपूर येथे बैठकीसाठी गेले असता परत येताना ही बाब कळताच त्यांनी रात्री ८.३० वाजता थेट कंपनीत जाऊन घटनास्थळ गाठले. घटनास्थळाची पाहणी करत संपूर्ण घटनाक्रम कामगारांकडून जाणून घेतला. त्यानंतर कामगारांशी चर्चा करून कंपनी व्यवस्थापनाची बैठक घेतली. कंपनी व्यवस्थापनाकडून मृत कामगारांच्या कुटुंबीयांना तात्काळ नुकसान भरपाई, नोकरी व इतर लाभ देण्याबाबत मागणी लावून धरली. कंपनी व्यवस्थापन टाळाटाळ करण्याच्या भूमिकेत असताना आमदार अडबाले यांनी त्यांचा "क्लास" घेत तात्काळ ॲग्रीमेंट करून नुकसान भरपाई द्या, अन्यथा रात्र इथेच काढू, अशी तंबी दिली. त्यानंतर कंपनी व्यवस्थापनाकडून मृत कामगाराच्या कुटुंबीयांना ७० लाख रुपये व इतर देय लाभ, कामगाराच्या पत्नीस धारिवाल कंपनीत शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी व अंत्यसंस्कारासाठी रोख ५ लाख रुपयांची मदत आमदार सुधाकर अडबाले यांनी रात्री ११ वाजता मिळवून दिली. त्याबाबतचे कंपनी व्यवस्थापनाकडून ॲग्रीमेंट लिहून घेतले. सोबतच भविष्यात अशा घटना कंपनीत घडू नये, याची काळजी घेण्याबाबत कंपनी व्यवस्थापनास तंबी दिली.


लोकमत

## कंपनी नरमली; ७० लाखांची मदत

### कामगार मृत्यू प्रकरण : सुधाकर अडबाले यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर** : ताडाळी एमआयडीसीतील धारीवाल कंपनीत बुधवारी (दि. १२) कर्णधर शेरके या कामगाराचा कर्तव्यावर असतानाच दबून मृत्यू झाला होता. कुटुंबाला मोबदला न देता कंपनीने मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न कामगारांनी हाणून पाळला. रात्री उशिरा माहिती मिळाल्यानंतर कंपनीत जाऊन मृतकाच्या कुटुंबाला ७० लाखांचा धनादेश व इतर लाभ मिळवून दिल्याने कामगारांचा रोष शांत झाला, अशी माहिती आमदार सुधाकर अडबाले यांनी दिली.

चंद्रपुरातील भिवापूर वार्डातील कर्णधर शेरके या फिल्ड ऑपरेटरचा कंपनीमध्ये कोल हँडलिंग प्लांटमध्ये रिफ्लेक्टर जॅकेट अडकल्याने जागीच ...

**११** वाजता बुधवारी रात्री मदतीस कंपनीने होकार दिला.

कुटुंबाला करार पत्र देताना आ. सुधाकर अडबाले.

### दोषी अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

अधिकारी दोषी असल्याने सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित करण्याची ग्वाही आमदार अडबाले यांनी कामगारांना दिली. जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्याचेही सांगितले. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी यादव, तहसीलदार पवार, शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रामू तिवारी, सोहेल रजा, प्रशांत भारती, सचिन कत्याल, दिगांबर कुरेकार, सुरेंद्र अडबाले, दीपक थोपटे, धारीवाल पॉवर प्लांट वीज कामगार संघाचे अध्यक्ष हेमराज गेडे, सागर गादेवार, पवन ढवळे व कामगार उपस्थित होते.

14, 2025
lego.com



चंद्रपूर

कुटूंबियांना मदतीचा धनादेश देताना आमदार सुधाकर अडबाले.



# अपघातग्रस्त शिक्षक, विद्यार्थ्यांची विचारपूस

दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सरस्वती विद्यालय, शंकर नगर नागपूर या शाळेची शैक्षणिक सहल गेली असता शिक्षक व विद्यार्थ्यांचा अपघात झाला. शाळेमध्ये भेट देऊन मुख्याध्यापक तसेच तेथील कर्मचाऱ्यांची भेट घेऊन माहिती घेतली. सोबतच एम्स हॉस्पिटल नागपूर येथे व्यवस्थापक, अपघातग्रस्त शिक्षक, विद्यार्थी यांची भेट घेऊन विचारपूस केली.

# अपघातग्रस्तास पोहोचविले रुग्णालयात

आमदार सुधाकर अडबाले हे १ जानेवारी २०२५ रोजी गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना आरमोरी येथील कार्यक्रम आटोपून तळोधी (ता. नागभीड) येथे कार्यक्रमासाठी जात असताना बाळापूर मार्गावर रस्त्यावर अपघातग्रस्त व्यक्ती रक्तबंबाळ अवस्थेत असल्याचे आढळले. तेव्हा क्षणाचाही विलंब न करता आमदार सुधाकर अडबाले यांनी तात्काळ अपघातग्रस्तास आपल्या गाडीत टाकून जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र बाळापूर येथे घेऊन गेले. आरोग्य केंद्रात पोहोचल्यानंतर डॉक्टरांना तात्काळ उपचार करण्यास सांगितले. अपघातग्रस्त आबाजी वाडगुरे (रा. बाळापूर) यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारार्थ ब्रह्मपुरी येथे हलविण्यात आले. आमदार अडबाले यांच्या या संवेदनशील कृतीमुळे उपस्थित गावकऱ्यांनी त्यांचे कौतुक केले.



# सोशल मीडियावरील प्रतिक्रिया

**Pund Sir**

> Nagrade
> आश्रमशाळा शिक्षकांना एकस्तर पदोन्नती योजना सुरू-आमदार सुधाकर अडबाले यांच्या पाठपुरा...

आदरणीय नमस्कार साहेब...!!

आपल्या प्रति असलेल्या आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या तळमळीने समस्या हक्कासाठी लढा देणारा महाराष्ट्र राज्यातील एकमेव शिक्षक आमदार नेता.. म्हणून आपण महाराष्ट्रात सुपरिचित आहात...!!
त्याचबरोबर सर्व सामान्य शिक्षक सोबत आपण प्रत्यक्ष मंत्रालय स्तरावर स्वतः पाठपुरावा टरता हि अभिमानची बाब आहे..
आपण प्रत्यक्ष लक्ष घालुन... एकस्तर पदोन्नतीसाठी अथक प्रयत्न केले.. खोडा घालणारे अधिकारी यांना सरळ करण्यात यशस्वी झालात...
आपले आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी प्रति प्रेम सहानुभूती प्रचंड भव्यदिव्य आहे..
आश्रम शाळा कर्मचारी यांच्या मनात घर निर्माण केलं आहे..
आपल्या कार्याला सलाम... साहेब...
किशन पुंड.... 🌹🍬🍬🍬 08:06

👍

मोहसीनभाई झवेरी महाविद्यालय, देसाईगंज येथील आम्ही सर्व कर्मचारी तब्बल सात महिन्यांचे थकीत वेतन या गंभीर अश्या आर्थिक समस्येला सामोरे जात होतो. आमच्या या समस्येवर तोडगा काढण्याकरिता **माननीय आमदार श्री. अडबाले सर** यांनी विद्यापीठ प्रशासन व माननीय सहसंचालक यांच्याकडे व्यक्तिशः सतत पाठपुरावा केला. या परिणामस्वरूप आम्हाला आमचे मागील सात महिन्यांचे थकीत वेतन विद्यापीठामार्फत प्राप्त झाले आहेत. त्यांची मोलाची साथ व मार्गदर्शन आम्हाला वेळोवेळी लाभले याकरीता आम्ही सरांचे शतशः ऋणी आहोत. उपासमारीची वेळ आपल्या लोकांवर येऊ नये ही कळकळ मनाशी ठेवून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुध्द लढत राहणारे नेतृत्व आम्हाला लाभले हे आमचे अहोभाग्य आहे. उपाशी पोटी राहूनही निगरगट्ट प्रशासन व व्यवस्थापनाच्या विरुद्ध लढा देता येतो व त्यातून न्याय मिळतोच असा विश्वास यांच्या नेतृत्वातुन आम्हाला मिळाला. खूप खूप धन्यवाद सर.
आपले आभारी,
डॉ. सुचिता टी. पेद्दिवार
सत्यनारायण व्ही. पुसाला
डॉ. गौरव आर. निंबार्ते
डॉ. रामकृष्ण एम. येरोजवार
डॉ. दिप्ती के. इंगोले
सचिन बी. लोणारे
प्रवीणकुमार पी. पत्रे 11:46

👍

**Keshettiwar Santosh**

> You
> ४ प्रकरणांना ऑन द स्पॉट मान्यता 📚📚 ...

खरंतर भाऊचं कौतुक करावं तेवढं कमी आहे. भाऊंनी निवडून आल्यापासून पायाला भिंगरी बांधल्यासारखे न थकता न थांबता शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग,समाज कल्याण विभाग एवढेच नव्हे तर संबंधित विभागाच्या आयुक्तांसोबत प्रत्यक्ष बसून ऑन द स्पॉट कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी झटत असतात.👍
भाऊंच्या या अतुलनीय कार्यास सलाम 🙏 17:58

🙏👍 3

**Janbandhu Teacher ATC Gad**

> You
> https://whatsapp.com/channel/0029VaRFyYYATRSq6R5csG3n

नागपूर विभागाचे लोक प्रिय, तडपदार, कर्तव्यनिस्ट आमदार मा.सुधाकर अडबाले साहेब यांनी गडचिरोली जिल्यातील अतिदुर्गम आदिवासी बहुलभाग असलेल्या आश्रम शाळेत तसेच खाजगी शाळांनमध्ये जाऊन प्रत्येक्षात शिक्षक कर्मचाऱ्यांच्या खऱ्या समस्या जाणून घेतल्या त्या बद्दल मी त्यांचे आभार मानतो... एक शिक्षक आमदार तळागाळातील कर्मचाऱ्यांसोबत राहून समस्या जाणून शासनास पाटपुरावा करणे व ते सोडवणुकी साठी अहोरात्र मेहनत घेणे हे आज पर्यतच्या पाहणीत पहिल्यांदाच पाहावयास मिळत आहे... या अगोदर जे शिक्षक आमदार होऊन गेले त्यांना कदाचित आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांच्या समस्या दिसेनसे झाले असावे त्यांनी कधीच आश्रम शाळेविषयी गांभीर्यने लक्ष घातले नाही.....?
मा.अडबाले साहेब शिक्षक आमदार झाल्यापासून यांनी पहिल्या दिवसापासूनच कर्मचाऱ्यांच्या पाटीमागे खंबीर पणे उभे आहेत व भविष्यातही ते उभे राहतील यात काही शंका नाही.. आश्रम शाळेतील प्रत्येक घटक साहेब आपल्या सोबत आहे...
आपला
विकास जनबंधू, सहसचिव
आदिवासी विकास कर्मचारी संघटना CITU
नागपूर 11:09

👍

**~ sanjaykatre** +91 95794 68988



16:29

👍

आज दिनांक 31/08/2024 रोज शनिवारला ला गिरजाबाई कन्या हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तिरोडा ला माननीय शिक्षक आमदार श्री सुधाकरजी अडबाले यांच्यातर्फे शाळेला कम्प्युटर संच आणि प्रिंटर देण्यात आले, त्याबद्दल संस्था अध्यक्ष, संस्थेचे पदाधिकारी,शाळेचे प्राचार्य आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे कडून आमदार महोदय यांचे मनपूर्वक धन्यवाद. असा आमदार होने नाही ज्याला आपल्या शिक्षकांचे हित कशात आहे याची जाणीव आहे. विध्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सोबतच शाळेच्या कामासाठी आपल्या निधीतून इतक्या कमी वेळात सदर साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल पुनःश्च आमदार महोदयांचे मनपूर्वक आभार....👆 16:30

**Mankar Sir**

साहेब आम्ही ऋणी आहोत आपले.
दिवाळी पूर्वी आलेला पगार म्हणजे आम्ही केलेल्या मतदानाची पोचपावती, आम्ही योग्य वेळी योग्य उमेदवाराला शिक्का मारला सर्व नागपूर विभागाकडून आपले खुप खूप आभार 🙏 09:13

**Dhanorkar Yadav**

एकमेव शिक्षक आमदार आहेत सगळ्या शिक्षकांना दिवाळी भेट मिळाली पण आपल्या शेतकरी बांधवासाठी प्रश्न मांडला असुन अभ्यासपुर्ण कार्य आहे आतापर्यंतचे आमदार पाहिले पण आमच्या हक्कासाठी स्वतः च्या जिवाचे रान करुन लढणारे पहिले आमदार पाहिले आहे .....एकमेव भाऊसाहेब 16:06

👍

**Nagrade**

> You
> बीड जिल्ह्यातील शिक्षकाने आत्महत्या केली. त्यामुळे राज्यातील अंशतः अनु...

एकचं आमदार महाराष्ट्रात सर्व शिक्षकांना न्याय देण्यासाठी सदनात झगडतो आहे, साहेब आपला अभिमान आहे आम्हाला... 20:48

आदरणीय, सुधाकररावजी अडबाले ,आमदार साहेब आपले खूप खूप अभिनंदन आणि शतशः आभार. 🙏🙏🙏
महाराष्ट्रातील एम फिल धारक प्राध्यापकांचा प्रश्न आपल्या प्रयत्नामुळे सुटलेला आहे.
महाराष्ट्रातील इतर शिक्षक आमदार आणि संबंधित खात्याचे मंत्री तसेच सत्ताधारी पक्षाशी संबंधित प्राध्यापकांची संघटना यांनी एम फिल धारक प्राध्यापकांचा प्रश्न आम्ही सोडविला असा कितीही कांगावा केला तरी , मिळालेल्या यशाचे मानकरी आपणच आहात.
महाराष्ट्रातील एम फिल पात्रता धारक प्राध्यापकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळवून देण्यात आपण पुढाकार घेतला आणि हा प्रश्न तुमच्या पुढाकारामुळे तुम्ही केलेल्या पाठपुराव्यामुळे शासनाकडून सोडवून प्राध्यापकांना न्याय मिळवून दिला. महाराष्ट्रातील प्राध्यापकांना दिलेली ही भेट आम्ही आजन्म विसरणार नाही. आम्ही आपले सदैव ऋणी राहू. माननीय आमदार सुधाकरराव अडबाले साहेब,महाराष्ट्रातील एक कर्तुत्ववान, , अभ्यासू आणि लोकप्रिय नेतृत्व. पुढे आले आपल्या तत्पर कार्यकुशल नेतृत्वाचा महाराष्ट्राला परिचय झाला, याचा आम्हाला अतिशय आनंद आहे .मिळालेल्या यशाचे मानकरी आपणच आहात. असेच सहकार्य यापुढेही लाभावे हीच अपेक्षा.
धन्यवाद सर.
आपला स्नेही.
डॉ. योगीराज उरकुडे
भगवंतराव कला महाविद्यालय सिरोंचा
(गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली)
🙏🙏🙏 12:19

**Thakre Rajura**

> Warkad Sir
> राज्यातील खासगी अनुदानित शाळेच्या जागेचे अकृषक कर शिथिल करा : आमदार सुधाकर ...

खाजगी अनुदानित शाळेसाठी फार महत्त्वाचा विषय मा.आमदार महोदयांनी मा.महसुल मंत्री महोदयांकडे मांडल्याबद्दल भरभरून अभिनंदन 18:11

**Lanjewar Dewnath Gadchiroli**

> You
> आमदार सुधाकर अडबाले यांनी अपघातग्रस्तास पोहोचविले रुग्णालयात...

नेहमीच संवेदना जपणारे आपले साहेब आहेत. आपल्या कार्यास कोटी कोटी सलाम . 🙏🙏🙏

~ Sandipa Ipar/Pit... +91 99223 57611



आज दिनांक २८/०४/२०२५ रोजी वर्धा जिल्हा परिषद सभागृह येथे समस्या निराकरण सभेत मा. आदरणीय श्री . सुधाकरजी अडबाले साहेब शिक्षक आमदार ( वि.मा.शी.)यांचे अथक प्रयत्नातून कुठल्याही प्रकारचे आर्थिक व्यवहार न करता माध्यमिक शिक्षणाधिकारी यांचे कडून मुख्याध्यापक वैयक्तिक मान्यता मंजूर करून देण्यात आली .मी मुख्याध्यापिका अण्णासाहेब गुंडेवार विद्यालय नारा कु. संदिपा सूर्यभान इपर मनापासून धन्यवाद व्यक्त करते आणि 🙏🙏🙏🙏 असेच आपले सहकार्य मिळत राहील अशी अपेक्षा व्यक्त करते. 🙏🙏🙏🙏 धन्यवाद साहेब 🙏🙏 जय विमाशी 🙏🙏 जय महाराष्ट्र 🙏 🙏 16:17

**Umesh Solanke** · Follow
महा ज्योती 2023 संशोधक विद्यार्थ्यांकडून खूप खूप धन्यवाद साहेब आमचा प्रश्न उपस्थित केल्याबद्दल... मागणी मंजूर व्हावी हीच विनंती....
2w Like Reply Hide

**Dhanshri Bangadkar**
Thank you so much sir..... अतिशय सुंदर पद्धतीने तुम्ही आमचा विद्यार्थ्यांचा प्रश्न विचारल्याबद्दल.
2w Like Reply Hide

**Suyog P Gurjar**
धन्यवाद sir tumi आमचा khara prashana midala baddal
2w Like Reply Hide

**Nana Tryambak Ghuge**
मा. आमदार साहेब आपले मन:पूर्वक धन्यवाद! महाज्योती फेलोशिप संदर्भात आपण अतिशय मोजक्या शब्दात प्रश्न विचारून अर्थपूर्ण माहिती दिली.
26m Like Reply Message Hide

Tajane Mahesh
You
आमदार सुधाकर अडबाले यांनी अपघातग्रस्तास पोहोचविले रुग्णालयात...



खूपच मानवता दृष्टिकोनातून केलेले हे कार्य आहे.. अशा आमच्या सन्माननीय शिक्षक आमदार साहेबांना दीर्घायुष्य लाभो व नवीन वर्ष सुख समाधानाचे जावो हीच शुभेच्छा... 🙏🌹🙏 18:52

Chandankhede Raju Hinganghat
You
Photo



सभागृहात शेतकऱ्यांचे प्रश्न पोट तिडकीने मांडल्या बद्दल धन्यवाद सर 🌹🙏
**एक शेतकरी** 12:31

**Sunil Kharat**
खूप खूप धन्यवाद साहेब आपण आमच्या प्रश्नांना पटलावर आणण्याचा प्रयत्न केला. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला प्रश्न आपण मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले नगरपालिका महानगरपालिका शिक्षक संघ च्या वतीने आपले खूप खूप आभार 💐🙏
2w Like Reply Hide 4

**Kundan Suryawanshi**
खूप खूप धन्यवाद साहेब आपण हा विषय शासनाच्या समोर आणला
2w Like Reply Hide

**Vinod S Ubarhande**
आपले सर्वप्रथम मन:पूर्वक अभिनंदन साहेब... आपण हा महत्त्वाचा मुद्दा शासन दरबारी मांडून नगर परिषद अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या अन्यायला वाचा फोडली.
2w Like Reply Hide 4

**Devendra Kharwade**
आदरणीय सर खूप छान प्रश्न मांडला, सर्व नगरपरिषद वंचित शिक्षकांना जुनी पेन्शन देण्याची आपण मागणी करावी ही विनंती
2w Like Reply Hide 3

**Mohammad Shakir**
धन्यवाद साहेब आपण आमच्या प्रश्नांना पटलावर आणण्याचा प्रयत्न केला. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला प्रश्न आपण मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले

**आदरणीय श्री.अडबाले साहेब ( शिक्षक प्रिय, विश्वासू शिक्षक आमदार , नागपूर विभाग. वि. प. सदस्य ,** 🙏 🙏🙏🙏🙏 आपण अंशत : अनुदानित शाळेला अनुदानाचा वाढीव टप्पा व विना अनुदानित शाळेला 20 % अनुदान टप्पा मिळविण्यामध्ये आपली खूप मौल्यवान मेहनत, सहकार्य लाभले . त्याबद्दल आम्ही सर्व समन्वयक आपले खुप आभारी आहोत. असेच सहकार्य जिल्हा स्तरावर लाभो अशी अपेक्षा साहेब. 🙏🙏
आपलेच विश्वासू व हितचिंतक
**समन्वय संघ , गडचिरोली** 🙏🙏
. 14:15

**रमेश जावळे पाटील**
शिक्षकांच्या समस्या विधान परिषदेत मांडण्यासाठी शिक्षक आमदार हा मुळातच शिक्षकच असावा कारण शिक्षकाच्या समस्या तोच समजू शकतो.
22h Like Reply Message Hide

Wararkar Sir Gadchandur
You
https://www.facebook.com/share/v/1G7ehmEPKe/ (0:15)



शिक्षक आमदार सन्मा.आडबाले साहेबाच्या बेधडक नेतृत्वामुळे प्रकल्प कार्यालय अंतर्गत अनुदानित व शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांचे सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लागत आहे.हे सर्व शक्य होत आहे आपला हक्काचा माणूस सन्मा.
आमदार साहेबामुळेच.
!! साहेब धन्यवाद !!
================== 18:52

You • Status
Video (1:00)



धन्यवाद आमदार साहेब एक शिक्षक आमदार असून देखील आपण कामगारांच्या प्रश्नांसाठी देखील लढत आहे हे फार अभिनंदन आणि अभिमानास्पद आहे 17:43

Arun Lanjewar
माझ्या बावीस वर्षांच्या सेवेत आज पहिल्यांदाच दिवाळी सणाच्या पूर्वी आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांचे चालू महिन्याचे वेतन झाले,ते अडबाले सरांच्या प्रयत्नानेच.
नागपूर विभागात बहुतेक सर्व च जिल्हांचे वेतन काल खात्यात जमा झाले.
नागपूर विभागातील सर्व जिल्ह्याच्या वतीने अडबाले सरांचे मन:पूर्वक धन्यवाद 🙏 06:59

**Anant Salunke**
धन्यवाद सर...... केंद्रप्रमुख विभागीय परीक्षेसाठीची अधिसूचना आपल्या प्रयत्नातून प्रकाशित झाली त्याबद्दल आभारी आहोत..... आता फक्त अधिसूचनेनुसार तात्काळ परीक्षेचे आयोजन व्हावे यासाठी आपणांकडून सहकार्याची अपेक्षा 🙏🙏💐💐💐
1w Like Reply Hide

**Manojkumar Rathod**
अगदी बरोबर, आपण सभागृहत मागणी लावून धरली व त्यामुळे अधिसूचना प्रसिद्ध झाली 🙏🙏🙏
1w Like Reply Hide 1

**Ajit Mahadev Sao**
सर
आपले चंद्रपूर मध्ये केंद्रप्रमुख परीक्षेची तयारी करणाऱ्या शिक्षकांकडून मन:पूर्वक अभिनंदन तथा आभार 👏👏
Just now Like Reply Message

**Rajendra Zade**
आज इथे तर उद्या तिथे सतत पायाला चक्री बांधल्या प्रमाणे दौरे करीत असतात आमचे आमदार साहेब....
5m Like Reply Message

**Saarthak Mundhe**
एकमेव शिक्षक आमदार......
25m Like Reply Message 1

**Ramesh Kakde**
जय हो
2h Like Reply Message 1

**Manoj Dhandre**
राज्यातील शिक्षकांचा हक्काचा माणूस मा . आमदार आडबाले सर
2h Like Reply Message 1

More Padmakar
आमच्या दिव्यांग शाळेचे वेतन मागील चार महिन्यांपासून जिल्हा समाज कल्याण कार्यालय यांच्या निष्क्रियपणामुळे, यांच्या वेळ काढू धोरणामुळे अडलेले होते परंतु मा. सुधाकर भाऊ अडबाले सर यांच्या सक्रिय पाठपुराव्यामुळे आमचे वेतन दिवाळी पूर्वी झाले आणि आम्हा सर्व कर्मचाऱ्यांची दिवाळी ही आनंदाने साजरी होईल. मा. सुधाकर भाऊ अडबाले सरांचे खूप खूप धन्यवाद...🙏 10:43
👍

Warkad Sir Nag.
सन्माननीय अडबाले सर आपण प्रत्यक्षपणे माननीय संचालक यांच्यासोबत भेट घेऊन नमुना स्वाक्षरीचा प्रश्न सोडविला व त्यामुळे नागपूर जिल्ह्यातील सर्व शिक्षकांचे वेतन झालेत त्याबद्दल आपले आभार 21:42

# विकासकामे

**581**

शाळांना संगणक व इतर शैक्षणिक साहित्य वाटप



**रु. 5.50 कोटी**

६ जिल्ह्यातील शाळांना शैक्षणिक साहित्यासाठी निधी

**91**

जि. प. शाळांना ई-लर्निंग क्लास रुम



**रु. 2.07 कोटी**

जि. प. शाळांना ई-लर्निंग क्लास रुमसाठी निधी
(खनिज)

**रु. 2.80 कोटी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी निधी
(खनिज)






**रु. 24 लक्ष**

क्रीडा स्पर्धांसाठी निधी



मुंबई

२३ जुलै २०२५

# 'रोजगार हमी योजना'सह तीन समित्यांवर नियुक्ती

नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांचे विधान परिषदेतील कार्य पाहता त्यांची 'रोजगार हमी योजना समिती, इतर मागासवर्ग कल्याण समिती व कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे' या तीन समित्यांवर सभापती प्रा. राम शिंदे यांनी विधान परिषद सदस्यांमधून सदस्यपदी नियुक्ती केली.

सदर नियुक्तीनंतर पार पडलेल्या समितींच्या बैठकांना आमदार सुधाकर अडबाले यांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली. यात 'रोजगार हमी योजना समिती'ची बैठक २१ मे २०२५, ११ जून २०२५, २३ जुलै २०२५ व ६ ऑगस्ट २०२५ रोजी तर 'कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे' समितीची बैठक १३ जून २०२५ रोजी पार पडली. या बैठकांमध्ये उपस्थित राहून रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांना गती देणे, विकासकामांचे आराखडे बनविणे तसेच योजना प्रभावीपणे कार्यान्वित करणे, या विषयांवर चर्चा करून त्याबाबत निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.





विधान परिषद सदस्यांसह सामुहिक छायाचित्रप्रसंगी मान्यवरांसह उपस्थित आमदार अडबाले.



आमदार सुधाकर अडबाले यांच्या विजयानंतर अभिनंदन करताना विधीमंडळ पक्षनेते मा. विजय वडेट्टीवार, खासदार प्रतिभाताई धानोरकर, आमदार ॲड. अभिजीत वंजारी.



आमदार सुधाकर अडबाले यांचे कुटुंबीय.

'सुधाकरपर्व' या विशेषांकात मी केलेल्या प्रयत्नांचा सविस्तर वृत्तांत सादर केला आहे. मला विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात पाठविणाऱ्या माझ्या शिक्षकवृंदांचे ऋण फेडण्यासाठी मी सदैव तत्पर असून विद्यार्थी, शिक्षक, शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कायम कटिबध्द राहील...!

- सुधाकर अडबाले

विधान परिषद सदस्य



www.sudhakaradbale.in

